रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३२४
www.ramprahar.com

मंगळवार, ११ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग

पती-पत्नीच्या वादात पाच महिन्यांच्या मुलीचा मृत्यू/२

लाडवली पुलाचे काम अद्यापही रखडलेले; 'रास्ता रोको'/५

पाकिस्तानवर विजयासह भारताचा विश्वविक्रम/८

### राज्य बाल धोरण व कृती आराखड्याचा प्रारूप मसुदा प्रसिद्ध



**मुंबई** : राज्य महिला व बालविकास विभागांतर्गत बाल धोरणाचा प्रारूप मसुदा तयार करण्यासाठी गठीत समितीने बाल धोरण व कृती आराखडा २०२२ मसुदा तयार केलेला आहे. प्रस्तावित धोरण व आराखडा शासनाच्या https://womenchild.maharashtra.gov.in व https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. यामध्ये आवश्यक बाबी, सूचना, सुधारणा तसेच मराठी भाषेमध्ये भाषांतर करण्यात आलेल्या मसुद्यामध्ये शब्द रचना, व्याकरण या संदर्भाने हरकती व सूचना नागरिकांकडून मागविण्यात येत आहे. त्या ३० जून रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत महिला व बालविकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सर्कीट हाऊसजवळ, पुणे १ या पत्यावर अथवा childpolicy@gmail.com या ई-मेलवर पाठविण्याचे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

# देशातील शेतकऱ्यांना मिळणार पीएम किसान निधीचा लाभ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नरेंद्र मोदी यांनी रविवारी तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यामुळे आता देशात मोदी सरकार ३.० सुरू झाले आहे. शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोमवारी (दि. १०) पदभार स्वीकारला आणि पीएम किसान निधी सन्मान योजनेशी संबंधित

## पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारताच केली फाईलवर स्वाक्षरी

फाईलवर स्वाक्षरी केली.

पीएम किसान निधी सन्मान योजनेचा १७वा हप्ता शेतकऱ्यांना मिळणार आहे. या योजनेंतर्गत जवळपास २० हजार कोटी रुपयांचा



**"आमचे सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. त्यामुळेच पदाचा कार्यभार स्वीकारताच पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या कल्याणाशी संबंधित घेण्यात आला आहे. आगामी काळात शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी अधिकाधिक काम करण्याची आमची इच्छा आहे.**


**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

निधी दिला जाईल, ज्याचा फायदा देशातील ९.३ कोटी शेतकऱ्यांना होणार आहे.

**पीएम आवास योजनेतून तीन कोटी घरे बांधण्याचा निर्णय**

दरम्यान, एनडीए सरकारच्या पहिल्याच कॅबिनेट बैठकीत सरकारने पीएम आवास योजनेंतर्गत तीन कोटी घरे बनवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. जी नवी घरे बांधली जातील त्यात एलपीजी कनेक्शन, वीज कनेक्शन, नळ कनेक्शनही असतील. मागील १० वर्षांत जवळपास ४.२१ कोटी घरे बांधण्यात आली. पीएम आवास योजनेबाबत भाजपने त्यांच्या जाहीरनाम्यात आश्वासन दिले होते. त्यानंतर पहिल्याच कॅबिनेट बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी याबाबत निर्णय घेतला आहे.

# एनडीए सरकारचे खातेवाटप जाहीर



**राजनाथ सिंह**
संरक्षणमंत्री



**अमित शाह**
गृह व सहकारमंत्री



**नितीन गडकरी**
रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री



**निर्मला सीतारामन**
अर्थमंत्री आणि कॉर्पोरेट व्यवहारमंत्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा शपथविधी रविवारी झाल्यानंतर सोमवारी (दि.१०) खातेवाटप जाहीर करण्यात आले आहे. अमित शाह यांच्यावर पुन्हा एकदा गृहमंत्रिपदाची, तर राजनाथ सिंह यांच्याकडे संरक्षण मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली आहे. परराष्ट्र मंत्रालय एस. जयशंकर यांच्याकडेच देण्यात आले आहे. नितीन गडकरी यांच्याकडे पुन्हा त्यांचे रस्ते आणि परिवहन वाहतूक मंत्रालय असणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ७२ मंत्र्यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली होती. शपथ घेतल्यानंतर या मंत्र्यांना कोणकोणती खाती मिळणार याकडे सर्वांचे लक्ष होते. हे खातेवाटप जाहीर करण्यात आले.

**कुणाला कुठले खाते?**

**कॅबिनेटमंत्री** – राजनाथ सिंह : संरक्षण मंत्री, अमित शाह : गृह व सहकारमंत्री, नितीन गडकरी : रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री, जगतप्रकाश नड्डा : आरोग्य व कुटुंब कल्याण, रसायने व खतेमंत्री, शिवराजसिंह चौहान : कृषी व शेतकरी कल्याण, ग्रामविकास मंत्री, निर्मला सीतारामन : अर्थमंत्री व कॉर्पोरेट व्यवहारमंत्री, डॉ. सुब्रह्मण्यम जयशंकर : परराष्ट्र व्यवहारमंत्री, मनोहरलाल खट्टर : गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार, ऊर्जामंत्री, एच.डी. कुमारस्वामी : अवजड उद्योग आणि पोलादमंत्री, पीयूष गोयल : वाणिज्य आणि उद्योगमंत्री, धर्मेंद्र प्रधान : शिक्षणमंत्री, जीतन राम मांझी : सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगमंत्री, राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह : पंचायत राज आणि मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायमंत्री, सर्वानंद सोनोवाल : बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्गमंत्री, वीरेंद्र कुमार : सामाजिक न्यायमंत्री, के.आर. नायडू : नागरी विमान वाहतूकमंत्री, प्रल्हाद जोशी : ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरणमंत्री, जुआल ओरम : आदिवासी व्यवहारमंत्री, गिरीराज सिंह : वस्त्रोद्योगमंत्री, अश्विनी वैष्णव : रेल्वे, माहिती आणि प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स तथा माहिती तंत्रज्ञानमंत्री, ज्योतिरादित्य सिंधिया : दळणवळण, ईशान्य क्षेत्राचे विकासमंत्री, भूपेंद्र यादव : पर्यावरण, वन आणि हवामान बदलमंत्री, गजेंद्रसिंह शेखावत : सांस्कृतिक कार्य आणि पर्यटनमंत्री, अन्नपूर्णा देवी : महिला आणि बालविकासमंत्री, किरेन रिजिजू : संसदीय कामकाज, अल्पसंख्याक व्यवहारमंत्री, हरदीपसिंग पुरी : पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री, मनसुख मांडविय : कामगार आणि रोजगार, युवा कार्य तथा क्रीडामंत्री, जी. किशन रेड्डी : कोळसा आणि खाणमंत्री, चिराग पासवान : अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री, सी.आर. पाटील : जलशक्तीमंत्री.

**(राज्यमंत्र्यांची खातेनिहाय यादी पान २ वर..)**


## अभिनंदन अन् शुभेच्छा!



**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा शपथविधी रविवारी झाला. या मंत्रिमंडळात महाराष्ट्रातील भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी पुन्हा एकदा कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ ग्रहण केली. याबद्दल पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, नवी मुंबईतील बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## निवडक

### 'एमसीए'चे अध्यक्ष अमोल काळे यांचे अमेरिकेत निधन



**न्यूयॉर्क** : मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) अध्यक्ष अमोल काळे यांचे अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. ते टी-२० वर्ल्डकपमधील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पाहण्यासाठी न्यूयॉर्कला आले होते. त्यांच्याबरोबर एमसीएचे सचिव अजिंक्य नाईक आणि अपेक्स काउन्सिलचे सदस्य सूरज सामंतही होते. काळे यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त होत आहे.

### मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांच्या ताफ्यावर अतिरेकी हल्ला

**इम्फाळ** : मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांच्या ताफ्यावर सोमवारी (दि. १०) सकाळी अतिरेक्यांनी हल्ला केला. सुदैवाने हल्ल्यातून मुख्यमंत्री बचावले आहेत. कारमधून आलेल्या तिघांनी सकाळी १०.४०च्या सुमारास हा हल्ला केला. ताफ्यातील सुरक्षा रक्षकांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. यामध्ये एक सुरक्षा रक्षक जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून मुंबई कोस्टल रोड बोगद्याची पाहणी

### मरीन ड्राईव्ह ते हाजी अली उत्तर वाहिनी खुली



**मुंबई : प्रतिनिधी**

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा मार्गावरील मरीन ड्राईव्ह परिसर ते हाजी अली परिसरापर्यंत उत्तर वाहिनी सोमवार (दि. १०)पासून खुली करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या बोगद्याची पाहणी केली. या वेळी मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी हेही उपस्थित होते.

उत्तरवाहिनी मार्गिका खुला केल्यामुळे शहरातील वाहतूक अधिक वेगवान होणार असून सुमारे पाऊण तासांचे हे अंतर अवघ्या १० मिनिटांत कापता येणे शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. भुलाभाई देसाई मार्ग, बॅरिस्टर रजनी पटेल चौक आणि वत्सलाबाई देसाई चौक (हाजीअली चौक)पर्यंत जाणे यामुळे सुलभ होणार आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबईकरांना वाहतूक कोंडीतून दिलासा देणाऱ्या सागरी किनारा मार्गाचा पहिला नऊ किलोमीटरचा टप्पा खुला केला होता. आजपासून सव्वा सहा किलोमीटरचा दुसरा टप्पा खुला झाला आहे. सागरी किनारा मार्गाचा नरिमन पॉईंट येथून वरळीपर्यंत जाणाऱ्या मार्गाची पाहणी केली. नरिमन पॉईंट ते हाजीअलीपर्यंतच्या सव्वा सहा किलोमीटर लांबीचा हा बोगदा आजपासून सुरू करण्यात आला आहे. जुलै महिन्यापर्यंत नरिमन पॉईंट ते वरळी हा सागरी मार्गाचा तिसरा टप्पाही सुरू होईल. **(पान २ वर..)**

## मुंबईत इमारतीचा भाग कोसळून दोन जणांचा मृत्यू



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या विक्रोळी येथे पार्कसाईट विभागात रविवारी रात्री पडलेल्या मुसळधार पावसात एका निर्माणाधीन इमारतीचा काही भाग कोसळल्याने दोघांचा मृत्यू झाला आहे. नागेश रेड्डी आणि रोहित रेड्डी अशी मयतांची नावे आहेत.

नागेश रेड्डी हे या इमारतीचे सुरक्षारक्षक म्हणून काम करीत होते. रविवारी रात्री साडेअकराच्या सुमारास ते कामावर आले असताना त्यांचा दहा वर्षांचा मुलगा रोहित हा त्यांना जेवणाचा डबा घेऊन तिकडे आला. जोरदार पाऊस पडत असल्यामुळे त्यांनी त्यांच्या मुलाला तिथेच थांबण्यास सांगितले. याचदरम्यान अचानक या इमारतीचा काही स्लॅब आणि लोखंडी ढाचा थेट त्यांच्यावर पडला. यात या दोघांचा जागीच मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी त्यांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## राज्य मंत्रिमंडळाचा अधिवेशनापूर्वी विस्तार?

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार स्थापन होऊन नव्या मंत्र्यांचा शपथविधी झाला आहे. त्यानंतर आता महाराष्ट्रात राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याची शक्यता आहे. यामध्ये काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची चर्चा आहे

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवशेनाला २७ जूनपासून सुरुवात होणार आहे. या अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार करून सरकारच्या कामाचा वेग वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या मुख्यमंत्र्यांसह ४३ इतकी राहू शकते. सध्या २९ मंत्री आहेत. याचा अर्थ आणखी १४ जणांना संधी दिली जाऊ शकते. शिवसेनेचे मंत्री संदिपान भुमरे औरंगाबादमधून निवडून आले आहेत. त्यामुळे ते मंत्रिपदाचा आणि आमदारकीचाही राजीनामा देतील. त्यामुळे आणखी एका मंत्र्यांचा समावेश होऊ शकतो.



याशिवाय महामंडळाच्या नियुक्त्याही या वेळी केल्या जातील, जेणेकरून विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीच्या घटकपक्षांमधील नेत्यांमध्ये उत्साह निर्माण होईल.

दरम्यान, विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन येत्या २७ जूनपासून सुरू होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने तशी शिफारस गुरुवारी राज्यपालांना पाठवली आहे. यापूर्वी १० जूनपासून हे अधिवेशन सुरू होणार होते, मात्र विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लक्षात घेता हे अधिवेशन २७ जूनपासून घेण्याबाबतची शिफारस मंत्रिमंडळाने केली आहे.

## महाराष्ट्र शिक्षण क्रांती संघटनेचा आमदार निरंजन डावखरे यांना पाठिंबा



**ठाणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेच्या कोकण विभाग कार्यकारिणीच्या झालेल्या बैठकीत कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार व संघटनेचे सल्लागार निरंजन डावखरे यांना पाठिंबा देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला, अशी माहिती संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष रमेश निवृत्ती जाधव यांनी दिली.

शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस, कोषाध्यक्ष देविदास नरवाडे, विभाग सचिव ज्ञानेश्वर गोसावी, राज्य कार्यकारिणी सदस्य एस.जी. पाटील, विभागाचे पदाधिकारी, सर्व जिल्हाध्यक्ष आणि सचिव सभेवेळी उपस्थित होते.

गेल्या १२ वर्षांपासून आमदार निरंजन डावखरे हे पदवीधर आमदार असून शिक्षण क्रांती संघटनेचे सल्लागार आहेत. संघटनेच्या शासकीय दप्तरी कामांकरिता त्यांचे सातत्याने सहकार्य लाभत असून त्यांना विभागातील समस्यांची संपूर्णपणे जाण आहे, असे नमूद करीत शिक्षण क्रांती संघटना पूर्ण ताकदीनिशी डावखरेंसोबत राहणार असल्याचे राज्याध्यक्ष सुधीर घागस यांनी सांगितले.

इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सोडवणे तसेच सर्वांना जुनी पेन्शन लागू करण्यासाठी महालढा उभारणे आदींकडे संघटना अधिक लक्ष देणार असल्याचे सभेत ठरविण्यात आले, असेही घागस म्हणाले.

या वेळी उत्तम कांबळे, महेंद्र जाधव, डॉ. शहाजहान मौलना, राजेंद्र गवळी, सुरेश साळवे, संदेश पाटील, योगेश वल्लाळ, थॉमस शिनगारे, प्रशांत घागस, किशोर राठोड, अनिल मुरादे, प्रा. रमेश बुटेरे, सुरेंद्रनाथ दुसाने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## माथेरानमध्ये वाहतुकीचे नवे पर्व

### आणखी २० ई-रिक्षा प्रवाशांच्या सेवेत रूजू

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या पर्यटन इतिहासामध्ये एक महत्त्वाचा टप्पा ठरणाऱ्या नव्या २० ई-रिक्षा सोमवार (दि.१०) पासून प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू झाल्या असून पहिल्याच दिवशी वाढीव ई-रिक्षांना पर्यटकांचा भरघोस प्रतिसाद लाभला. या वेळी या रिक्षांचे स्वागत करण्याकरिता रस्त्यांच्या दोन्ही बाजूस माथेरानमधील असंख्य नागरिक उपस्थित होते.



सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार माथेरानमध्ये सध्या ई-रिक्षाचा प्रायोगिक तत्त्वावर चालवण्याचा प्रकल्प सुरू आहे, परंतु ज्या कष्टकऱ्यांना त्यांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता या रिक्षा आणल्या गेल्या त्यांना डावलून बाहेरील ठेकेदारामार्फत येथे रिक्षा चालवल्या जात होत्या. त्यास स्थानिक हातरिक्षाचालकांनी विरोध दर्शवून कोर्टामध्ये दाद मागितली होती. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने २० ई-रिक्षा हातरिक्षाचालकांना चालवण्यास परवानगी दिली होती. त्यानुसार सोमवारी या रिक्षा स्थानिक पर्यटक व विद्यार्थ्यांच्या सेवेमध्ये रूजू झाल्या असून माथेरानचे मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांनी रिक्षांना हिरवा झेंडा दाखवून पर्यटकांकरिता त्या सुरू केल्याचे जाहीर केले.

नव्या ई-रिक्षा सुरू झाल्याने हातरिक्षाचालकांचे स्वप्न पूर्ण झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. रिक्षाचालकांनी फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला. प्रारंभिक तत्त्वावर सध्या जरी २० ई-रिक्षांना परवानगी मिळाली असली तरी टप्प्याटप्प्याने सर्वांनाच या रिक्षा दिल्या जाणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले. त्यामुळे लवकरच इतरही हातरिक्षाचालकांना सन्मानजनक व्यवसाय उपलब्ध होईल अशी आशा ते करीत आहेत.

दरम्यान, २० ई-रिक्षांमुळे माथेरानच्या पर्यटनमध्ये क्रांती घडणार असून पर्यटकांना अगदी स्वस्तामध्ये एक नवीन पर्याय उपलब्ध झाल्याने माथेरानकडे येणाऱ्या पर्यटकांमध्ये प्रचंड वाढ होणार आहे. त्यामुळे येथील पर्यटनही भरभराटीला येणार असल्याचे येथील अनेक नागरिकांनी या वेळी बोलून दाखवले.

# पावसाळ्यात आरोग्याला प्राधान्य द्या

## पनवेल महापालिकेचे साथीच्या आजारांबाबत आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले आहे. वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत पावसाळ्यात घ्यावयाच्या खबरदारी विषयी जनजागृती विविध माध्यमांतून करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.



पावसाळ्यामध्ये अनेकदा दूषित पाण्यामुळे कॉलरा, गॅस्ट्रो, विषमज्वर असे जलजन्य रोग होण्याची भिती असते त्यामुळे नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. तसेच भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहिरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे.

अतिसार झाल्यास क्षार संजिवनी मिश्रणाचा वापर करावा. घरांतर्गत डास उत्पत्तीस्थाने टाळण्यासाठी घरातील फुलदाणी मनीप्लँट, वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक वेळा पुर्णपणे काढून कोरडे करून कोरडा दिवस पाळावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले,ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ज्या ठिकाणी स्वच्छता पाळली जात नाही अशा हॉटेल इतर ठिकाणी, खाणे, पाणी पिणे टाळावे, बाहेरील बर्फ खाणे टाळावे. ताप सर्दी, खोकला अशा प्रकारची लक्षणे असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

# पनवेल क्षेत्रात ६२ अतिधोकादायक इमारतींमध्ये २७४ कुटुंबांचे वास्तव्य

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई आणि उपनगरात धोकादायक इमारती पडून त्यात निष्पापांचा जीव जाण्याच्या घटना वारंवार घडतात. दरवर्षी या घटनेत वाढ होत असते, मात्र या घटनांना पूर्णविराम मिळत नाही. पनवेल महापालिका क्षेत्रातदेखील शेकडो धोकादायक इमारती घोषित केल्या आहेत. विशेष म्हणजे पालिकेने या इमारती धोकादायक तर घोषित केल्या, मात्र आजही या धोकादायक इमारतीत शेकडो कुटुंब वास्तव्यास असल्याने भविष्यात याठिकाणी दुर्दैवी घटना घडू शकते.

पालिकेने या इमारतींची वर्गवारी केली आहे. या वर्गवारीत धोकादायक आणि अतिधोकादायक असे दोन भाग केले असून सर्वाधिक अतिधोकादायक आणि धोकादायक इमारती पनवेल आणि कळंबोली शहरात आहेत. या ६२ अतिधोकादायक इमारतीत २७४ कुटुंब



वास्तव्यास आहेत. पनवेल शहरात जीर्ण व धोकादायक इमारती कित्येक वर्षांपासून उभ्या आहेत. पनवेल नगर परिषदेच्या काळापासून या इमारती उभ्या आहेत. गणेश देशमुख पनवेल महापालिकेचे आयुक्त असताना धोकादायक इमारतीच्या पुनर्विकासाला गती मिळाली. पालिकेने धोकादायक इमारतीवर बॅनर लावुन धोकादायक इमारतीच्या आवारात कोणी प्रवेश करू नये असे बॅनर लावले आहेत, मात्र या धोकादायक इमारती पाडण्यासाठी पालिका प्रशासन पुढे का धजावत नाही, असा प्रश्न नागरिकांमधून विचारला जात आहे.

अतिधोकादायक इमारतीमध्ये खारघरमध्ये तीन, कळंबोलीमध्ये १८०, कामोठ्यात २१ आणि पनवेल शहरात ७० कुटुंब अतिधोकादायक इमारतीत वास्तव्यास आहेत. पालिकेने या इमारतींची यादी जाहीर केली आहे. काही इमारतींचे पाणी आणि वीज जोडणीदेखील बंद करण्यास सुरुवात केली आहे. यावर आता तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे.

## निवडक

### नातेवाईकाकडून तरुणीवर बलात्कार

**पनवेल :** खारघर येथे राहणाऱ्या नातेवाईकांकडे राजस्थान येथून कामासाठी आलेल्या एका नराधमाने त्या घरातील १९ वर्षीय तरुणीवर बलात्कार करून तिचे अश्लील व्हिडीओ काढून तिला धमकाविल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. खारघर येथे १९ वर्षीय पीडित मुलगी आपल्या कुटुंबीयांसह राहत होती. तिच्याकडे कामासाठी आलेल्या २५ वर्षीय नातेवाईकाने तिच्यावर बलात्कार करून तिचे अश्लील व्हिडीओ काढून तिला धमकाविले. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आरोपीचा शोध सुरू आहे.

### लाडीवली येथे अपघातात तिघे जखमी

**मोहोपाडा :** गावाजवळ एका ट्रकसदृश्य अज्ञात भरधाव वाहनाने स्कूटीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन जण जखमी झाले. मोहोपाडा येथून पल्लवी संदीप जंगम (वय ३२, रा. मोहोपाडा) या मोहोपाडा ते आपटा फाटा जात होत्या. लाडीवली गावाजवळ पाठीमागून येणाऱ्या वाहनाने ओव्हरटेक करीत असताना त्यांच्या स्कूटीच्या हँडलला धक्का दिला. यात स्कूटी खाली पडून पल्लवी जंगम व त्यांच्यासोबत असणाऱ्या सपना अविनाश महाडिक व दिया अविनाश महाडिक या तिघी जखमी झाल्या. पल्लवी यांना मोहोपाडा येथील पल्स हॉस्पिटलमध्ये तर सपना यांना गांधी हॉस्पिटल, पनवेल येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

### नवीन पनवेलमधून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** नवीन पनवेल, सेक्टर पाच येथील राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता १९ वर्षीय रोहिणी रूपेश घोलप ही तरुणी निघून गेली. ती घरी परत न आल्याने ती हरवली असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या तरुणीने घरात चिठ्ठी लिहून ठेवली असून तिच्या मर्जीने लग्न करण्यासाठी घर सोडून जात असल्याचे म्हटले आहे. तिची उंची पाच फूट, बांधा सडपातळ, चेहरा गोल आहे. तिने अंगात लाल कुर्ता, सफेद रंगाची लेगीज आणि चप्पल घातली आहे. या तरुणी बाबत अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार एम. बी. पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : महापालिकचे नवनियुक्त आयुक्त मंगेश चितळे यांचे बहुजन वंचित विकास संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष इब्राहिम इक्बाल नावडेकर यांनी अभिनंदन केले.**

# भाजप नेते ब्रिजेश पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त खारघरमध्ये वृक्षारोपण

**खारघर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष, खारघर मंडलचे माजी अध्यक्ष तथा उत्तर रायगड जिल्ह्याचे सचिव ब्रिजेश पटेल यांचा वाढदिवस सेक्टर १९ येथील मैदानात वृक्षारोपण कार्यक्रम राबवून साजरा करण्यात आला.

या वेळी पनवेल विधानसभेचे प्रभाग ४चे माजी सभापती, नगरसेवक अभिमन्यू पाटील, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष किरण पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील या मान्यवरांसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधव यांनी शुभेच्छा दिल्या.

खारघर शहरातील शांत, संयमी, सुस्वभावी, अजातशत्रू, अनुभवी संघटक, कुशल नेतृत्व असे व्यक्तिमत्व अशी ब्रिजेश पटेल यांची ओळख आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली २०१७ची पनवेल महानगरपालिकेची पहिली ऐतिहासिक सार्वत्रिक निवडणुकीत खारघर शहरातून



शत प्रतिशत नगरसेवक निवडून आले होते. दांडगा लोकसंग्रह, समर्पित भावना, हसतमुख स्वभाव व लाघवी बोलणे या गुणांमुळे अनेक नागरिक त्यांच्याकडे आकर्षित होत असतात. खारघरमधील सर्वांत लोकप्रिय असे सामाजिक व राजकीय व्यक्तिमत्व अशी त्यांची ओळख आहे. महाराष्ट्र प्रदेश सोशियल मीडिया महिला मोर्चा सहसंयोजिक बीना गोगरी, मंडल चिटणीस गुरू ठाकूर, शैलेन्द्र त्रिपाठी, कुणाल सांगानी, युवा मोर्चा उत्तर रायगड चिटणीस शुभ पाटील, अनिल खोपड़ेजी, विपूल चोटलिया, प्रवीण बेरा, अशोक जांगिड़, दीपक ठाकूर, राजेंद्र प्रभु, अश्विनी भुवड, माया सींग, सोमा बिश्वास, गायत्री महापात्रा, झूमा चक्रवर्ती, दुर्गा देवी, रजनी शर्मा, अशोक अच्छा, वृक्षप्रेमी जीवाराम चौधरी, दिलीप पटेल, महेश पटेल, दिलीप नायर त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक राजकीय व आराजकीय पदाधिकारी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# तक्का-विचुंबे भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहनचालकांना दिलासा

**पनवेल : वार्ताहर**

तक्का गावाकडून विचुंबेकडे जाणारा भुयारी मार्ग सुरू करण्यात आला आहे. ऐन पावसाळ्यात हा मार्ग सुरू करण्यात आल्याने नवीन पनवेलकरांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. १३ जानेवारीपासून हा भुयारी मार्ग दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला होता. हा मार्ग सुरू झाल्याने नवीन पनवेल उड्डाणपुलावरील वाहतुकीचा ताण काही प्रमाणात कमी होणार आहे. भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

पनवेल शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर पनवेलच्या पूर्व भागात झाला आहे. रेल्वेमार्गामुळे पूर्व भागातील विस्तार होणाऱ्या पनवेलला जोडण्यासाठी दोन पूल व एक भुयारी मार्गाची निर्मिती करण्यात आली आहे. विचुंबेकडून पनवेलला जाण्यासाठी आणि तक्काकडून विचुंबे, नवीन पनवेलला येण्यासाठी हा भुयारी मार्ग सोयीस्कर आहे. या भुयारी मार्गामुळे नवीन पनवेलमधील फायर ब्रिगेड, एचडीएफसी सर्कल मार्गाने पनवेल बसस्थानकावरील वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागत नाही.

या भुयारी मार्गावर रेल्वे ट्रॅकच्या दुपदरीकरणाचे काम करण्यासाठी हे मार्ग तीन महिन्यांसाठी बंद करण्यात आला होता. दोन ते तीन दिवसांपासून हा भुयारी मार्ग सुरू करण्यात आला आहे. हा भुयारी मार्ग बंद झाल्यामुळे पनवेलला जोडणाऱ्या उड्डाणपुलावर वाहतुकीवर ताण येत होता. या मार्गावर वाहतूक कोंडी होत होती. याचा त्रास प्रवासी व वाहनचालकांना होत होता. हा भुयारी मार्ग पुन्हा सुरू झाल्याने वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे नवीन पनवेल उड्डाणपुलावरील वाहतुकीचा ताण कमी झाला आहे.

तक्कामार्गे विचुंबे, नवीन पनवेलकडे, तर नवीन पनवेल–विचुंबेमार्गे पनवेल, तक्काकडे ये–जा करण्यासाठी भुयारी मार्गाचा वापर केला जातो. त्यामुळे पनवेल पूर्व भागातील नागरिकांना नवीन पनवेलसह तक्का भुयारी मार्गाचा वापर करता येणार आहे.



**पनवेल : कर्नाळा हास्य क्लबचे ज्येष्ठ सभासद नानालाल पोपट यांचा पंचाहत्तरीनिमित्त सन्मान करण्यात आला. हास्यक्लबचे प्रशिक्षक मधुकर नाझरे यांनी नानालाल पोपट यांचे त्यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी गजानन भगत, शशिकांत वाळुंज, रवींद्र देसाई, महेंद्र जेठवा, जयंतीलाल पंड्या, आर.जी. पाटील, अरविंद पाटील, प्रभाकर पानारे व राजकुमार ताकमोगे हे सदस्य उपस्थित होते.**

# पांडवकडा धबधब्यावर पर्यटकांना बंदी कायम

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल, नवी मुंबईसारख्या सिमेंटच्या जंगलात खारघर शहरामधील नैसर्गिक पांडवकडा धबधबा पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. या धबधब्यावर सुरक्षेच्या कारणावरून यंदाही वन खात्याने बंदी घातल्याने पर्यटकांचा हिरमोड होणार आहे.

खारघरमधील पांडवकडा धबधब्यावर दरवर्षी हजारो पर्यटक येतात, मात्र अतिउत्साहाच्या भरात किंवा हलगर्जीपणामुळे अनेक वेळा याठिकाणी अपघात घडले आहेत आणि अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळेच वनखात्याने याठिकाणी पर्यटकांना येण्यास मज्जाव केला आहे. यंदाही पांडवकडा धबधब्यावर पर्यटकांना प्रवेश नाकारण्यात आला आहे. वनविभागाच्या या निर्णयावर



अनेक पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे. पांडवकडा धबधबा हा नवी मुंबईमधील आकर्षणाचा केंद्रबिंदू असताना त्याठिकाणी प्रवेश नाकारणे हे चुकीचे असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. पांडवकडा धबधब्याला पर्यटन क्षेत्राचा दर्जा अद्याप मिळालेला नाही. वनविभागाने पर्यटकांसाठी प्रवेश बंद केल्यानेच याठिकाणच्या पर्यटन क्षेत्राला चालना कशी मिळणार, असा प्रश्न या वेळी उपस्थित होत आहे. पर्यटकांच्या जीव धोक्यात जाऊ नये म्हणून आम्ही हे पाऊल उचलले आहे. पर्यटकांनी नियमांचे उल्लंघन करू नये. याठिकाणी बंदोबस्तासाठी पोलिसांनादेखील पत्र लिहणार असल्याची माहिती वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी देविदास सोनावणे यांनी सांगितले.

गाढ़ेश्वर डॅम, गाढी नदी पात्राजवळील धबधबे याठिकाणी बंदी असणार आहे. दरवर्षी या ठिकाणांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त असतो. शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदी घातली गेली असली तरी कर्नाळा अभयारण्यात पर्यटकांना निसर्ग पर्यटनाचा लाभ घेता येणार आहे.

# ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेत बनारसच्या कुणाल वर्मा यांचे गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३१ वे पुष्प झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामध्ये झालेल्या झालेल्या या कार्यक्रमात बनारस येथील कुणाल वर्मा यांनी आपली गायन सेवा सादर केली.

प्रसिद्ध गायक ओंकार दादरकर यांचे शिष्य असलेल्या कुणाल वर्मा यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात पुरीया रागातील विलंबित एक तालातील बंदिशीने केली. त्यानंतर राग शंकरामधील छोटा ख्याल सादर केला.

शास्त्रीय संगीत गायल्यानंतर त्यांनी 'राम रंगी रंगले, विष्णुमय जग, अबीर गुलाल' ही भक्तिगीते सादर केली. त्यानंतर 'जय गंगे भागीरथी' हे नाट्यगीत सादर केले. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या भैरवीने त्यांनी संगीत सभेची सांगता केली.

कुणाल वर्मा यांना अथर्व देव यांनी संवादिनी, गौरव बॅनर्जी यांनी तबला साथ तर गणेश घाणेकर यांनी तालवाद्यसाथ केली. समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. नामस्मरण केंद्रातील कार्यकर्त्यांनी संगीत सभा यशस्वी होण्यासाठी मोलाचे योगदान दिले.






**उरण : भाजप युवा मोर्चा शहर अध्यक्ष निलेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार व उमेदवार निरंजन डावखरे यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, ज्येष्ठ नेते जीवन गावंड आदी.**

# कामगार नेते शाम म्हात्रेंच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**उरण :** दिवंगत ज्येष्ठ नेते शाम पदाजी म्हात्रे यांच्या सहाव्या पुण्यस्मरणानिमित्त रविवारी (दि. ९) अनेक ठिकाणी अभिवादन करण्यात आले.

सकाळी आगरी शिक्षण संस्था शाळेत अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास कामगार नेत्या श्रुती शाम म्हात्रे यांच्या हस्ते स्व. शाम म्हात्रे यांच्या प्रतिमेला पुष्हार अर्पण करण्यात आला. त्या वेळी आगरी शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक पंकज भगत तसेच शिक्षक वृंद उपस्थित होते. श्रुती म्हात्रे यांनी स्वामी



समर्थ फाउंडेशन या संस्थेला आर्थिक मदत केली.

संध्याकाळी गणेश मंदीर तसेच व्यावसायीक विक्रेता संघ येथील व्यापारी वर्गानेदेखील अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

# पनवेलमध्ये विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

## महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा पनवेल तालुक्याच्या वतीने पनवेलमध्ये समाजातील विद्यार्थाचा गुणगौरव समारंभ व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम झाला.

पनवेल शहरातील टपाल नाका येथील शनी मंदिरात झालेल्या या समारंभासाठी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष गणेश महाडीक, रायगड जिल्हा महिला अध्यक्ष संज्योत चाळेकर, पनवेल तालुका अध्यक्ष सुनील खळदे तसेच समाज बांधव व गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते. समाजातील १० व १२ परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार त्याचप्रमाणे पहिली ते बारावीतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत मान्यवरांच्या हस्ते वह्यावाटप करण्यात आले.



या वेळी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष गणेश महाडीक म्हणाले, समाजातील विद्यार्थ्यांसाठी राबवित असलेल्या शैक्षणिक उपक्रमांबद्दल तालुका अध्यक्ष सुनील खळदे यांचे कौतुक करून समाजातील विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक सुविधांचा आपल्या गुणवत्तेसाठी उपयोग करावा असे सांगितले. पनवेल तालुका अध्यक्ष सुनील खळदे यांनी आपल्या भाषणात,जगनाडे महाराज सुदुंबरे येथे धार्मिक यात्रा, महिलांसाठी हळदीकुंकू, समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम हे समाजासाठी उपक्रम राबवले जात असून समाज एकतेसाठी समाजाने एकत्र यावे, अशी आवाहन सुनील खळदे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुकाराम किरवे यांनी केले तर आभार प्रवीण धोत्रे यांनी मानले.


## संपादकीय

# एनडीएचे जम्बो मंत्रिमंडळ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार देशात तिसऱ्यांदा सत्तेवर आले आहे. या जम्बो मंत्रिमंडळात पंतप्रधान मोदींसह ७२ जणांचा समावेश आहे. नव्या टर्ममध्ये अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार मोदी व सहकाऱ्यांनी केला आहे.

**केंद्रीय मंत्रिमंडळात ३० कॅबिनेट, पाच स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्री आणि ३६ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. सबका साथ सबका विकास हे पंतप्रधान मोदी आणि भाजपचे उद्दिष्ट आहे. याचे प्रतिबिंब भाजपप्रणित एनडीएच्या मंत्रिमंडळातही दिसून येते. मंत्रिमंडळात सर्व राज्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. आघाडी सरकारमुळे काही मर्यादा असल्या तरी सर्वसमावेशकता जपण्याचा प्रयत्न केला गेला आहे. घटकपक्षांना यामध्ये उचित स्थान देऊन एनडीए एकसंध असल्याचे दाखवून देण्यात आले आहे. कॅबिनेट मंत्री म्हणून राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, जेपी नड्डा, शिवराजसिंह चौहान, निर्मला सीतारामन, एस जयशंकर, मनोहर लाल खट्टर, एच.डी. कुमारस्वामी, पीयूष गोयल, धर्मेंद्र प्रधान, जीतनराम मांझी, लल्लन सिंह, सर्बानंद सोनोवाल, वीरेंद्र कुमार, राम मनोहर नायडू, प्रल्हाद जोशी, ज्युएल ओरोम, गिरीराज सिंह, अश्विनी वैष्णव, ज्योतिरादित्य सिंधिया, भूपेंद्र यादव, गजेंद्रसिंह शेखावत, अन्नपूर्णा देवी, किरण रिजीजू, हरदिपसिंह पुरी, मनसुख मांडविया, जी किशन रेड्डी, चिराग पासवान, सी.आर. पाटील; राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)पदी राव इंद्रजीत सिंह, डॉ. जितेंद्र सिंह, अर्जुन राम मेघवाल, प्रतापराव जाधव, जयंत चौधरी; तर राज्यमंत्री म्हणून जितीन प्रसाद, श्रीपाद नाईक, पंकज चौधरी, कृष्णपाल गुर्जर, रामदास आठवले, रामनाथ ठाकूर, नित्यानंद राय, अनुप्रिया पटेल, व्ही. सोमण्णा, डॉ. चंद्रशेखर पेम्मास्वामी, एसपी सिंह बघेल, शोभा करंदलाजे, किर्तीवर्धन सिंह, बीएल वर्मा, शांतनू ठाकूर, सुरेश गोपी, एल मुरगन, अजय टमटा, बंडी संजयकुमार, कमलेश पासवान, भागीरथ चौधरी, सतीशचंद्र दुबे, संजय सेठ, रवनीस सिंह बिट्टू, दुर्गादास उईके, रक्षा खडसे, मजमूदार, सावित्री ठाकूर, तोकन साहू, राजभूषण चौधरी, भूपती राजू, हर्ष मल्होत्रा, मुरलीधर मोहोळ, निमुबेन बंभानिया, जॉर्ज कुरीयन, पबित्रा मार्गारिटा यांना संधी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातून सहा जण केंद्रीय मंत्रिमंडळात आहेत. यामध्ये अपेक्षेप्रमाणे भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी तसेच पियुष गोयल यांचे स्थान कायम राहिले. आरपीआयचे नेते रामदास आठवले यांनाही भाजपचा मित्र पक्ष म्हणून या वेळीदेखील जागा मिळाली. याशिवाय रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांना संधी मिळाली आहे. शिवसेनेला मिळालेल्या एका जागेवर प्रतापराव जाधव यांना मंत्रीपद देण्यात आले आहे. राष्ट्रवादीला एक राज्यमंत्रीपद देऊ केले होते, परंतु त्यांना कॅबिनेट मंत्रीपद हवे असून त्यासाठी ते वाट पहायला तयार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. यशावकाश राष्ट्रवादीचाही मंत्रिमंडळात समावेश होईल. राजधानी दिल्लीत झालेल्या शानदार सोहळ्यात नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. या सोहळ्यास शेजारी राष्ट्रांचे प्रमुख आणि देशभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यामध्येही सर्व घटकांना प्राधान्य देण्यात आले होते. अशा प्रकारे नवे मंत्रीमंडळ स्थापन झाले असून आता खातेवाटपाची प्रतीक्षा आहे. दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळानंतर आता महाराष्ट्रात मंत्रीमंडळ विस्ताराचे वेध लागले आहेत. अधिवेशनापूर्वी ते अपेक्षित आहे.**

# लोकप्रिय साहित्यिक साने गुरुजी

साने गुरुजी हे नाव कोणाला माहित नाही असे नाही कारण हे नाव सर्वांना माहित आहे कारण ते एक लोकप्रिय साहित्यिक होते आणि त्यांच्या अनेक कविता आणि पुस्तके खूप प्रसिद्ध होती. आज त्यांचा स्मृतीदिन आहे, चला तर आता आपण साने गुरुजी यांच्याविषयी जाणून घेऊयात.

एक लोकप्रिय साहित्यिक म्हणून ज्यांची ओळख होती असे साने गुरुजी यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ मध्ये महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावामध्ये झाला होता. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पाडुरंग सदाशिव साने असे होते पण त्यांच्या अनेक चांगल्या आणि लोकप्रिय कवितांच्यामुळे, पुस्तकांच्यामुळे आणि लेखांच्यामुळे त्यांचे नाव साने गुरुजी असे पडले आणि आता त्यांना साने गुरुजी या नावानेच ओळखले जाते. साने गुरुजी यांच्या वडिलांचे नाव सदाशिव साने आणि आईचे नाव यशोदाबाई साने असे होते.

साने गुरुजी यांच्यावर त्यांच्या आईचा खूप प्रभाव होता आणि त्यांच्या आईने त्यांच्यावर चांगले संस्कार घडवले होते. साने गुरुजी यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमळनेर या ठिकाणी असणाऱ्या प्रताप या हायस्कूल मध्ये ते एक शिक्षक म्हणून काम करू लागले आणि मग त्यांनतर त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना आणि वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार कसा निर्माण करायचा तसेच या जगामध्ये सावाभिमानाने कसे जगायचे या बद्दल माहिती दिली किंवा मुलांना धडे दिले.

साने गुरुजी हे एक लोकप्रिय साहित्यिक तर होतेच परंतु यांना एक संवेदनशील स्वातंत्र्यसैनिक देखील होते आणि त्यांना देशाविषयी खूप अभिमान होता आणि ते एक महान देशभाकत देखील होते आणि त्यांनी स्वातंत्र्य लढ्यातील अनेक चळवळींच्यामध्ये भाग घेतला होता. साने गुरुजी यांनी इ. स. १९२८ मध्ये ‘विद्यार्थी’ मासिक चालू केले. साने गुरुजी यांना सामाज्यामध्ये असणाऱ्या अस्पृश्यता रुढींच्या बद्दल खूप चीड यायची आणि त्यांना वाटायचे कि ह्या सर्व परंपरा मोडीस काढल्या पाहिजे.

साने गुरुजी हे अस्पृश्यता रूढी (उदा : अस्पृश लोकांनी कोणत्याही मंदिरात जाऊ नये अशी पूर्वी प्रथा होती.) आणि समाजातील कर्मकांड या गोष्टींच्या विरोधात होते आणि त्यांना हे सर्व मोडून काढायचे होते म्हणून त्यांनी १९४६ मध्ये त्यांनी पंढरपूरमधील विठ्ठल मंदिरामध्ये प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्न केले आणि त्या प्रयत्नांना यश आले. त्यांनी पंढरपूरमधील विठ्ठल मंदिरामध्ये प्रवेश मिळावा म्हणून उपोषण केले होते आणि या प्रयत्नांना यश मिळाले त्यांना मंदिरामध्ये प्रवेश मिळाला. तसेच त्यांनी एक संवेदनशील स्वातंत्र्य सैनिक म्हणून कामदेखील केले त्यांनी इ. स. १९३० त्यांनी करत असलेली नोकरी सोडून त्यांनी सविनय कायदेभंग या चळवळीमध्ये भाग घेतला.

याचबरोबर त्यांनी शेतकऱ्यांना दुष्काळ प्रसंगामध्ये करमुक्ती मिळावी म्हणून काँग्रेस या साप्ताहिकामध्ये लेख लिहून प्रयात केले. त्यांनी इ. स १९४२ मध्ये भूमिगत चळवळ आणि जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथे झालेले काँग्रेसचे अधिवेशन यशस्वीरित्या पूर्ण करण्यास त्यांना यश मिळाले. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये आपल्या देशाला ब्रिटीशांच्यापासून स्वातंत्र्य मिळाले मग साने गुरुजींनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर त्यांनी समाजवादी पक्ष्यामध्ये प्रवेश मिळवला आणि मग त्यांनी इंटरऑपरेटिव्ह चळवळ चालू केली.

त्यामध्ये त्यांनी आपल्या देशातील लोकांना एकमेकांशी जोडण्याचा प्रयत्न केला म्हणजेच आपल्या देशामध्ये वेगवेगळ्या जातीचे, वेगवेगळ्या धर्माचे, वेगवेगळी भाषा बोलणारे, तसेच त्यांच्या परंपरे नुसार वस्त्र घालणारी असे लोक होते आणि साने गुरुजी यांनी इंटरऑपरेटिव्ह चालवली मधून भारतातील वेगवेगळ्या जातीच्या, वेगवेगळ्या धर्माच्या आणि वेगवेगळ्या भाष्या बोलणाऱ्या अनेक लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आणि जरी आपली जात, धर्म वेगवेगळी असली तरी मानव हा एकच आहे आणि मानवता हाच खरा धर्म आहे असे त्यांनी सांगितले.

साने गुरुजी हे जरी स्वातंत्र्य सैनिक असले तरी ते एक चांगले साहित्यिक आणि लेखकदेखील होते आणि त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या लेखनाची आवड देखील होती. ज्यावेळी त्यांनी कविता लिहिण्यास आरंभ केला त्यावेळी त्यांनी अनेक कविता लिहिल्या आणि त्यांची पहिली कविता म्हणजे,

बलसागर भारत होवो ।
विश्वात शोभूनी राहो ॥
राष्ट्रार्थ प्राण हे उरले । मी
सिध्द माराया हो ॥

ते सतत कोणत्या ना कोणत्या साप्ताहिकातून लेख लिहायचे आणि त्यांचे त्यांनी सुरु केलेले पहिले साप्ताहिक म्हणजे ‘विद्यार्थी’ साप्ताहिक होते त्यानंतर त्यांना ‘साधना’ हे साप्ताहिक सुरु केले मग त्यांनतर त्यांच्या अनेक कविता, लेख, पुस्तके, कादंबरी यासारखे आणि साहित्य पाहायला मिळाले. त्यांनी अनेक पुस्तके लहिली असतील म्हणजेच त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली आहेत आणि त्यामधील त्यांचे लोकप्रिय पुस्तक म्हणजे श्यामची आई हे आहे आणि हे पुस्तक (कादंबरी) आजही तितकेच लोकप्रिय आहे. त्यांच्या साहित्यामध्ये समाज सुधारणा, मानवतावाद आणि देशभक्ती या विषयी साहित्य आहे म्हणजेच त्यांनी कविता, लेख, पुस्तके हि ह्याच विषयांच्यावर लिहिलेली आहेत.

साने गुरुजी यांना संस्कृत, मराठी, तमिळ, बंगाली आणि इतर काही भाषा येत होत्या. त्यांनी सलग १५ महिने कारावास भोगला होता आणि त्यांनी त्यांचे बऱ्यापैकी लेखन हे तुरुंगामध्ये असतानाच केले आहे. तसेच त्यांनी आणखीन एक कविता लिहिलेली होती आणि तीदेखील खूप लोकप्रिय आहे आणि ती म्हणजे,

खरा तो एकची धर्म । जगाला
प्रेम अर्पावे ॥
जगी जे हीन अतिपतित ।
जगी जे दिन पददलित ॥

अश्या प्रकारे साने गुरुजींनी भारताच्या इतिहासामध्ये अनेक मोलाची कामगिरी केली. त्यांनी अनेक स्वातंत्र्य चळवळींच्या मध्ये भाग घेतला तसेच भारताच्या साहित्यामध्ये मोलाची भर पाडली. साने गुरुजी हे भारताला लाभलेले संवेदनशील स्वातंत्र्यसैनिक आणि एक चांगले साहित्यिक होते. साने गुरुजी (पांडुरंग सदाशिव साने) हे ११ जून १९५० मध्ये मरण पावले.

महाराष्ट्र राज्यातील रायगड या जिल्ह्यामध्ये असणाऱ्या माणगाव या गावाजवळ वडघर हे गाव आहे आणि त्या ठिकाणी साने गुरुजींच्या स्मरणार्थ स्मारक उभारले आहे तसेच पुण्यामध्येदेखील साने गुरुजी यांच्या स्मरणार्थ स्मारक उभे केले आहे. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# रिल्स स्क्रोल करताना आता जाहिराती पाहाव्या लागणार!





यूट्यूब, फेसबुक, स्पॉटिफाय आदी अनेक ॲप्सवर स्क्रोल करताना किंवा गाणी ऐकताना स्किप न करता येणाऱ्या जाहिराती पाहाव्या लागतात. त्यामुळे स्क्रोल करताना, थोडा वेळ थांबून ती जाहिरात जबरदस्तीने का होईना पाहावीच लागते. आता या ॲप्सच्या यादीत इन्स्टाग्राम पचासुद्धा समावेश होणार आहे.

इन्स्टाग्राम ‘ॲड ब्रेक्स’ नावाच्या नवीन फीचरची चाचणी करीत आहे, जे वापरकर्त्यांना रील्स किंवा एखादी पोस्ट स्क्रोल करणे सुरू ठेवण्यापूर्वी विशिष्ट कालावधीसाठी जाहिरात पाहण्यास भाग पाडणार आहे. ही चाचणी एक्स (X) आणि Reddit वर अनेक युजर्सनी पाहिली किंवा ऐकली असेल, तसेच इन्स्टाग्रामचे स्पोक्स पर्सन मॅथ्यू टाय यांनी सांगितले की, जबरदस्तीच्या जाहिरातींमुळे कंपनीला फायदाही होऊ शकतो आणि तोटाही होऊ शकतो, पण याचा अंतिम निर्णय कंपनीवर अवलंबून असेल.

इन्स्टाग्राम स्टोरी आणि पोस्ट स्क्रोल करताना युजर्सना ‘ॲड ब्रेक्स’ फीचरचा सामना करावा लागेल, उदा. युजर तेव्हा स्क्रोल करीत असतील. इन्स्टाग्राम एक काउंटडाउन टायमर स्क्रीनवर दाखवेल. हा टायमर संपेपर्यंत तुम्हाला न स्किप करता, ही जाहिरात पाहावी लागेल. म्हणजेच युजर्सना स्क्रोल करून पुढे जाणेही शक्य होणार नाही. एका युजरनेसुद्धा या फीचरचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे, ज्यामध्ये टायमरसह ‘ॲड ब्रेक’ चिन्ह आहे.

यादरम्यान जेव्हा वापरकर्ते more details या चिन्हावर टॅप करतात. तेव्हा इन्स्टाग्राम तुम्हाला एक मेसेज दाखवेल. त्यात लिहिलेले असते, ॲड ब्रेक्स हा इन्स्टाग्रामवर जाहिराती पाहण्याचा एक नवीन मार्ग आहे. स्क्रोलिंग सुरू ठेवण्यापूर्वी तुम्हाला जाहिरात पाहावी लागेल. या फीचरबद्दल युजर्सनी मात्र नाराजी व्यक्त केली आहे.

# उद्योजक घनश्यामदास बिर्ला



## निमित्त

आपल्या देशामध्ये अनेक असे उद्योजक होऊन गेले, ज्यांनी देशाचं भविष्य घडवण्यासाठी कठोर मेहनत घेतली. घनश्यामदास बिर्ला हे त्यांच्यापैकीच एक नाव. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

घनश्यामदास बिर्ला यांचा जन्म १० एप्रिल, १८९४ मध्ये राजस्थानच्या पिलानी गावात एका मारवाडी कुटुंबात झाला. शून्यातून विश्व निर्माण करणार्या व्यक्तींमध्ये हे नाव प्रामुख्याने घेतले जावे अशा पद्धतीचे त्यांचे कार्य होते. त्यांनी भारतामध्ये अनेक प्रकारच्या शिक्षण संस्था तसेच धार्मिक संस्थांची स्थापना करून भारताला प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी मदत केली. ज्याने एकेकाळी गरिबीचे चटके सहन केलेले आहेत, ज्याला गरिबी काय असते याची पूर्णपणे जाणीव होती, पण यामुळे त्यांनी परिस्थितीला कधीच दोष दिला नाही. त्यांनी त्यांचा संघर्ष नेहमीच चालू ठेवला. त्यांना स्वतःवर विश्वास होता. त्यांना माहिती होते की आपण आयुष्यामध्ये काहीतरी मोठे नक्कीच करून दाखवू शकतो. जेव्हा त्यांचा मृत्यू झाला त्यावेळी त्यांच्या बिर्ला ग्रुपच्या मालकीच्या दोनशे कंपन्या अस्तित्वात होत्या आणि या संपूर्ण कंपन्यांची एकूण संपत्ती दोन हजार कोटीच्या आसपास होती, पण हे सत्य खूप कमी जणांना माहिती असेल की घनश्यामदास बिर्ला त्यांच्या बंधूसोबत एका लहानशा खोलीमध्ये राहत असत. त्याच खोलीमध्ये स्वयंपाक करत असत आणि स्नानही त्याच खोलीमध्ये करत असत.

घनश्यामदास बिर्ला यांच्याबद्दल अजून एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, त्यांचे शिक्षण पाचवी पर्यंतच झालेले होते. ज्यावेळी त्यांचे मोठे बंधू त्यांना असे सांगत की आपलं नशीब आपल्या सोबत नाही, त्यावेळी घनश्यामजी त्यांच्या मोठ्या बंधूंना समजावून सांगत की नशीब आपल्या हातामध्ये असते आणि आपल्या कष्टाने आणि कर्मानेच आपण एक दिवस या जगाला काहीतरी नेत्रदीपक करून दाखवू. या सर्व प्रवासात त्यांचा स्वतः वरील विश्वास हीच त्यांची सर्वांत मोठी ताकद होती. त्यांनी काही दिवसांनी त्यांच्याकडील काही पैशांची जमवाजमव करून स्वतःचा सुती व्यवसाय सुरू केला.

ज्यावेळी त्यांनी हा व्यवसाय चालू केला, त्यावेळी या पूर्ण व्यवसायावर फक्त इंग्रजांचा एकाधिकार होता, त्यामुळे इंग्रजांनी त्यांना या व्यवसायामध्ये अनेक अडचणी उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. या परिस्थितीतही घनश्यामजी खचले नाहीत, त्यांना आशा होती की याही परिस्थितीतून ते मार्गक्रमण करतील आणि इतिहास साक्षी आहे, की त्यांनी या सर्व संकटांवर मात करत एक विशाल कार्य भारताच्या प्रगतीसाठी करून दाखविले. त्यांनी अशा परिस्थितीतही त्यांचा व्यवसाय यशस्वीरीत्या केला. त्यांनी एक नव्हे तर दोनशे कंपन्यांची स्थापना केली. त्यांची प्रगती इंग्रज थांबवू शकले नाहीत. बिर्ला यांनी अनेक मंदिरांची स्थापना केली, अनेक ट्रस्ट स्थापन केले, जे लोकांना गरजेच्या वेळी मदत करतात.

घनश्यामजींनी स्थापन केलेली पिलानी येथील बिट्स संस्था आज भारतातील अग्रगण्य अभियांत्रिकी संस्थांपैकी एक मानली जाते. त्यांनी समाजाचे देणे म्हणून मुंबईमध्ये एक विशालकाय इस्पितळ बनवून घेतले. त्यांनी देशभरामध्ये अनेक ठिकाणी शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना केली. अशा या महान उद्योजकाचे ११ जून १९८३ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : प्रसिद्ध देवस्थान असलेला कनकेश्वर परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. पावसाळ्यात तर या परिसराचे सौंदर्य आणखी खुलते.** (छाया : आदित्य वैद्य)

## आरोग्य प्रहर

# ‘ही’ आहेत तोंडाच्या कर्करोगाची प्राथमिक लक्षणे

तोंडाचा कर्करोग, ही एक अशी गंभीर आरोग्य स्थिती आहे, जी बऱ्याचदा अगदी नगण्य लक्षणातून डोके वर काढते, पण वेळीच लक्ष न दिल्यास जीवघेणी ठरू शकते. तोंडाचा कर्करोग हा संपूर्ण तोंडात कुठेही होऊ शकते. ओठ, हिरड्या, जीभ, गालाचे आतील अस्तर, तोंडाचे छप्पर आणि तोंडाच्या फरशीवर (जीभेखाली) तोंडाचा कर्करोग होऊ शकतो. डॉ. मृदुल मल्होत्रा यांनी फायनान्शियल एक्सप्रेसशी बोलताना मुखाच्या कर्करोगाच्या काही प्राथमिक लक्षणांविषयी माहिती दिली आहे. त्यानुसार आपण कोणत्या लक्षणांच्या बाबत जागृत असायला हवे हे पाहूया..



**सतत तोंडाला फोड येणे** : तोंडाच्या कर्करोगाच्या सर्वात सामान्य सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे घशामध्ये दोन आठवड्यांपेक्षा जास्त वेळ वेदना होणे, किंवा जळजळ जाणवणे. ओठ, जीभ, हिरड्या किंवा गालांच्या आतील अस्तरांवर फोड येण्यापासून याची सुरुवात होते, सुरवातीला हे फोड वेदनारहित असतात.

**रक्तस्त्राव** : कोणत्याही कारणाशिवाय तोंडातून रक्तस्त्राव होणे ही चिंताजनक बाब आहे. कर्करोगाशी संबंधित ऊतींच्या असामान्य वाढीचा हा परिणाम असू शकतो.

**पांढरे किंवा लाल ठिपके** : तोंडात ल्युकोप्लाकिया (पांढरे पॅच) किंवा एरिथ्रोप्लाकिया (लाल ठिपके) दिसून येऊ शकतात. हे डाग काहीवेळा लहानमोठ्या ॲलर्जीमुळे झालेले असू शकतात, तर अनेकदा कर्करोगाचे लक्षण ठरू शकतात. त्यामुळे याबाबत तज्ज्ञांचा सल्ला आवर्जून घ्या.

**गाठी होणे किंवा त्वचा घट्ट दिसणे** : तोंडात किंवा घशात सूज किंवा गाठ आल्याचे दिसून येते, ही वाढ ऊतींमधील घातक बदलांचे परिणाम असू शकते.

**गिळण्यात किंवा चघळण्यात अडचण** : तोंडाच्या कर्करोगामुळे डिसफॅगिया (गिळण्यात अडचण) किंवा ओडिनोफॅगिया (गिळणे) होऊ शकते. ट्युमरमुळे अन्ननलिकेत अडथळा आल्याने हा त्रास होऊ शकतो.

**सतत घसा खवखवणे** : दोन आठवड्यांपेक्षा जास्त वेळ सतत घसा खवखवणे, आवाजात बदल होणे असे त्रास जाणवणे हे मुखाच्या कर्करोगाचे प्राथमिक लक्षण असू शकते.

**कान दुखणे** : हे लक्षण कमी सामान्य असलं तरी, कोणत्याही संसर्गाशिवाय किंवा कारणाशिवाय कानाला वेदनाहोणे हे तोंडाच्या कर्करोगाशी संबंधित असू शकते.

**सुन्नपणा किंवा संवेदना कमी होणे** : जीभ, खालचा ओठ किंवा तोंडातील इतर भागात सुन्नपणा जाणवणे हा मज्ञातंतूवरील ताणाचा परिणाम असू शकतो.

# राजिपच्या शाळांमध्ये १५ जूनला प्रवेशोत्सव

## प्रभातफेरी, पुस्तके वाटप करून जल्लोषात होणार विद्यार्थ्यांचे स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू होत आहे. रायगड जिल्ह्यातील शाळांमध्ये पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी शाळांचा परिसर सजविण्यात येणार असून विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रभातफेरी, पुस्तके वाटप करण्यात येणार आहे. शिक्षण विभागाने त्याची तयारी सुरू केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी ही मातिही दिली आहे.



रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठ्यपुस्तके देण्यात येतात. ही पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात येत आहे. सरकारच्या बालभारती विभागाकडे शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी केली होती. सरकारकडून पुस्तके प्राप्त झाली असून, ही पुस्तके तालुक्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुख व केंद्रप्रमुखांच्या माध्यमातून मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या एक लाख ८४ हजार १६२ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात एकही शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत पाऊले उचलण्यात येत आहेत. १५ जून रोजी शाळा सुरू होणार आहेत. त्यापूर्वी ६ ते १४ वयोगटातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये, यासाठी प्रवेशपात्र बालकांच्या याद्या ग्रामपंचायत व शाळा फलकावर प्रदर्शित करण्यात येणार आहेत. प्रवेशपात्र बालकांची यादी लाऊडस्पीकरवर घोषित करून शैक्षणिक पदयात्रा व शिक्षकांच्या गृहभेटी व सरपंच, गावकरी, व्यवस्थापन समिती सदस्य, युवक, बचतगट, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वांच्या गृहभेटींचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच दिवशी स्वागत करण्यासाठी शाळांना तोरणे लावण्यात येणार आहेत. रांगोळ्या काढण्यात येतील. विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांमार्फत स्वागत करण्यात येणार आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पुष्प देऊन स्वागत करण्यात येईल. गावात, वार्डात प्रभातफेरी काढण्यात येईल. या प्रभातफेरीत युवक, गावकरी, ज्येष्ठ नागरिकांना प्रभातफेरीमध्ये सहभागी होण्याची विनंती करण्यात येणार आहे, तसेच शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्हस्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भेटीचे नियोजन करण्यात आले आहे.

### जि.प. शाळांचे रूपडे पालटले

जिल्हा परिषदेच्या शाळांचे रूप पूर्णपणे बदलून गेले आहे. डिजिटल क्लासरूम्स, कृतीयुक्त अध्ययन, विविध खेळ, सहशालेय व अभ्यासपूरक ज्ञानरचनावादी उपक्रम राबविले जात आहेत, तसेच मूल्यशिक्षणावर विशेष भर, प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जात आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रशिक्षित उच्च शिक्षित शिक्षक, तसेच विद्यार्थ्यांना शाळेत मोफत प्रवेश, मोफत गणवेश, मोफत मध्यान्ह भोजन, उपस्थिती भत्ता, शिष्यवृत्ती, संगणक शिक्षण या सुविधांचा लाभ दिला जात आहे.

# लाडवली पुलाचे काम अद्यापही रखडलेले

## संतप्त नागरिकांचा रास्ता रोको; ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

महाड ते किल्ले रायगड मार्गाला महामार्गाचा दर्जा देऊन त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम सुरू होऊन चार वर्षे झाली, तरी हा मार्ग पूर्ण होऊ शकला नाही. या मार्गावरील लाडवली पुलाचे काम पावसाळा सुरू झाला तरी झाले नसल्याने किल्ले रायगडसह या विभागातील २५ गावांचा संपर्क तुटणार आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी सोमवारी (दि.१०) रास्ता रोको करीत ठेकेदार व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.



किल्ले रायगड मार्गाचे काम मंजूर झाल्यानंतर गेल्या चार वर्षांत दोन ठेकदार बदलण्यात आले, तरीदेखील या मार्गाचे काम पूर्ण झालेले नाही. या मार्गावरील लाडवली पूल या विभागाला महाडशी जोडून ठेवतो. हा जुना पूल मार्चमध्ये पाडण्यात आला. त्यामुळे पुढील कामासाठी कमी दिवस शिल्लक राहिले. आता पाऊस सुरू झाल्यानंतर अधिकारी आणि ठेकेदाराला जाग आली आणि भर पावसात पुलाचे गर्डर हलवण्यास सुरुवात केली, मात्र चिखलामुळे मशनरी फसू लागल्याने आता या पुलाचे काम पूर्ण होणार नसल्याने नागरिकांनी रास्ता रोको केले.

त्याचप्रमाणे ठेकेदार व महामार्ग विभाग अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करीत तक्रार दाखल केली आहे.

आंदोलनाचे नेतृत्व भाजप जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शिवसेना महाड तालुका संपर्कप्रमुख रवींद्र तरडे, राजु कोरपे यांनी केले.

# कोयना वडविहीर येथील ब्लास्टिंगमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे

## तलाठ्यांकडून पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाच्या ब्लास्टिंगमुळे कोयना वडविहीर येथील ३० घरांचे मोठे नुकसान झाले आहे. सोमवारी (दि.१०) तलाठी अशोक बनसोडे यांनी या घरांमध्ये पाहणी करून याचे पंचनामे केले.



पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाच्या दुसऱ्या वाहिनीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. बेकायदेशीर ब्लास्टिंग केल्याने रविवारी येथील ३० घरांचे नुकसान झालेले आहे. यात भिंतींना तडे गेले आहेत. घरांचे पत्रे फुटले आहेत, काचेची तावदाने फुटली आहे. विद्युत जनित्रावर दगड पडल्याने शॉर्टसर्किटमुळे टिव्ही, फ्रीज, पंखे जळाले. घरांच्या भिंतीला तडे गेले आहेत.

तलाठी पंचनामे झाले तरी पोलिसांत तक्रार दाखल नाही. सोमवारी सकाळी तलाठी बनसोडे यांनी गावात येऊन पाहणी केली व घरोघरी फिरून नुकसानीचे पंचनामे केले.

# चौल नाक्यावर पहिल्याच पावसात रस्त्यावर डबकी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल नाक्यावर रस्ताच्या दयनीय अवस्थेने पहिल्याच पावसात पाण्याची डबकी तयार झाली आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांसह वाहनचालकांना रस्ता शोधावा लागत आहे.

अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यांना मध्यवर्ती ठिकाणी असलेले चौल नाका नित्याचा रहदारीचा रस्ता आहे. मुरूड तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित झाल्यानंतर चौलनाक्यावरील वाहनांची रेलचेल मोठ्या प्रमाणात वाढली आहे, मात्र चौल नाका रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. पहिल्याच पावसात रस्त्यात पाण्याची डबकी तयार झाली आहेत. यामुळे रस्त्यातील खड्ड्यांचा अंदाज वाहनचालकांना घेता येत नाही. त्यामुळे अपघात घडत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरीत या रस्त्याची दुरूस्ती करावी अशी मागणी होत आहे.

# नागोठणे लायन्स क्लबतर्फे नेत्रचिकित्सा शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

लायन्स क्लब नागोठणे तसेच आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या सहकार्याने मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. हे शिबिर शहरातील व्यापारी नजमुद्दीन व्होरा यांच्या सौजन्याने घेण्यात आले. या वेळी ७६ जणांची तपासणी करण्यात आली.

यामध्ये २२ मोतिबिंदू रुग्ण आढळले. त्या सर्वांना पनवेल येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आल्याची माहिती लायन्स क्लब सेक्रेटरी एमजेएफ विवेक सुभेकर यांनी दिली.

हे शिबिर व्हाईस प्रेसिडेंट लायन विवेक करडे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या मोतीबिंदू शिबिरास रिहाना व्होरा भाभी, खजिनदार संतोष शहासने, जॉईंट सेक्रेटरी लायन सुनील कुथे, एमजेएफ सुधाकर जवके, सुजाता जवके, डायरेक्टर दौलतराम मोदी, व्हाईस प्रेसिडेंट विशाल शिंदे, माधुरी सोष्टे, हुनेद सैफी, आब्बास सैफी, जुजर्र काचवाला, तसनीम काचवाला आदी उपस्थित होते.



# आंब्याचा सिझन आला अंतिम टप्प्यात

## खोपोलीत खरेदीला मोठा प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

मान्सूनची चाहूल लागली आहे. मागील दोन दिवसांपासून खोपोली व परिसरात उत्तम पाऊस पडत आहे. त्यातच अलिबाग, पेण-वरसई तसेच कर्जत व पळसदरी या भागातून विक्रीसाठी येणारा कच्चा हापूस आंब्याचे प्रमाणात काही प्रमाणात घट झाली आहे, मात्र गुजरातमधून येणारा बलसाड हापूस व केशर, कर्नाटकमधून येणारा आंबा मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध होत आहे. पावसाची चाहूल लागली असल्याने कोकणातील चविष्ट आंब्याचा सिजन आता अंतिम टप्प्यात आले आहे.



पाऊस सुरू होण्यापूर्वी कच्चा आंबा घेऊन घरी पारंपरिक पद्धतीने पिकवून ठेवण्यासाठी कच्चा आंबा घेण्यासाठी खोपोलीतील बाजारपेठेमध्ये नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. खास लोणच्यासाठी विक्री होत असलेल्या राजापुरी आंब्यालाही मोठी मागणी आहे.

सिजनच्या सुरुवातीला ३०० ते ३५० व मधल्या काळात २३० ते २५० रुपये डझन या दराने विक्री होणारा कच्चा हापूस आंबा आत्ता शेवटच्या टप्प्यात १८० रुपये पासून २०० रुपये दरात उपलब्ध आहे.

खोपोली शहरात रत्नागिरी जिल्ह्यातील तसेच अलिबाग, पेण, कर्जत या भागातून प्रामुख्याने कच्चा हापूस आंबा विक्रीसाठी येतो. पुढील चार-पाच दिवसांत मान्सून सक्रिय होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी मागील तीन-चार दिवसांपासून कच्च्या आंब्याची आवक वाढली आहे. सोबत तोतापुरी, राजापुरी, पायरी, केसर याचीही आवक बाजारात आहे. पाऊस सुरू होण्यापूर्वी आंबा खाण्याचा आनंद घेण्यासाठी व वर्षभर पुरेल असे लोणचे बनवून ठेवण्यासाठी आंबा खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे.


मा. पवार मॅडम कोर्ट

ॲड. इर्शाद शेख पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात...**

दि.चौ.अर्ज.क्र. ४८२/२०२४
नि. ८/ड
ने.ता. १८/६/२४

१) श्रीमती. करुणा नरेंद्र गुरसाहानी,
वय- ६४ वर्षे, धंदा - गृहिणी,
२) श्री. गौरव नरेंद्र गुरसाहानी,
वय- ३६ वर्षे, धंदा- नोकरी,
क्र. १ व २ रा. बी-२/३, वसंत पार्क सोसायटी,
चेंबुर पोलिस स्टेशन समोर, आर.सी. मार्ग,
चेंबुर, मुंबई ४०००७१
३) स्नेहा नरेंद्र गुरसाहानी उर्फ
स्नेहा स्वप्नील शेट्टी,
वय- ३१ वर्षे, धंदा- डॉक्टर,
रा. प्लॉट नं. ७६/बी-३,
शिवाई जी.एन.एस.एस. लि., छेडा नगर,
सुब्रमणीयम मंदिर, चेंबुर, मुंबई ४०००८९
} **अर्जदार**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांचे दि. ११/०७/२०२० रोजी देहावसान झाले आहे. कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांची आई कमला विशिनदास गुरसाहानी यांचे दि. १५/०८/२००२ रोजी देहावसान झाले आहे. तसेच कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांचे वडील विशिनदास लालचंद गुरसाहानी यांचे देखील दि. ०२/०८/१९९७ रोजी देहावसान झाले आहे. कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांचे मृत्युपश्चात त्यांना हिंदु कायद्यांतील तरतुदींनुसार अर्जदार क्र. १ ते ३ हेच कायदेशीर वारसदार आहेत.

श्रीमती. करुणा नरेंद्र गुरसाहानी वगैरे हयांनी कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांच्या नावे असलेल्या स्थांवर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे-उलवे, ता. पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर २० मधील भुखंड क्र. १८३, या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या निलसिध्दी जोया या इमारतीचे ए विंग मधील चौथ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ४०१, क्षेत्र ५४६ चौ. फुट कारपेट अधिक ३५ चौ. फुट बाल्कनी सहित अशा वर्णनाची निवासी सदनिका.

सदरहू वर नमुद मिळकतीमध्ये कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांचा अर्जदार क्र. १ यांचेसोबत ५० टक्के म्हणजेच निम्मा हिस्सा आहे.

वर श्रीमती. करुणा नरेंद्र गुरसाहानी वगैरे हे कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्रीमती. करुणा नरेंद्र गुरसाहानी वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. नरेंद्र विशिनदास गुरसाहानी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक १०/६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

**सही/-**
लिपिक
दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल,

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना**.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा १०८० | पेंधर १/२००८<br>पेंधर २१ | १५/३<br>२०/६<br>१०७/१ ५अ | ०-३२-१<br>०-२३-३<br>०-१६-० | ५०० चौ.मी. | भूखंड क्र.२१B, सेक्टर-१७, क्षेत्र -५०० चौ.मी. | १) श्रीमती सारिका सुजित पाटील<br>२) श्रीमती सपना अनंत कोपरकर<br>३) श्रीमती अस्मिता अनंता कोपरकर<br>४) श्रीमती अक्षता अनंत कोपरकर<br>५) श्रीमती अश्विनी अनंत कोपरकर **हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.**<br>१) श्रीमती इंदु बाळकृष्ण कोपरकर **हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.**<br>१) श्रीमती रत्ना उज्वल पाटील<br>२) श्रीमती रेष्मा रविदास भोईर<br>३) श्रीमती रोशनी प्रल्हाद नावडेकर **हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.**<br>१) श्रीमती विठाबाई काना पाटील **हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३७१०/२०२३, दि. ०३.०३.२०२३ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्रीमती अलका अनंत कोपरकर**<br>**२) श्री. संकेत अनंत कोपरकर**<br>**३) श्री. निकेत अनंत कोपरकर**<br>सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३७०८/२०२३, दि. ०३.०३.२०२३ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. जिवन बाळकृष्ण कोपरकर**<br>**२) श्रीमती जोत्सना अच्युत भोईर**<br>**३) श्रीमती वर्षा अभय पाटील**<br>सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३७०९/२०२३, दि. ०३.०३.२०२३ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. किरण दत्तु कोपरकर,**<br>**२) श्री. निलेश दत्तु कोपरकर**<br>सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३७०८/२०२३, दि. ०३.०३.२०२३ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. किरण दत्तु कोपरकर**<br>यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/०३८/२०२४-२५**

# फसवणुकीसाठी टास्कचा बहाणा

## नवी मुंबईतील एकाला साडेअठरा लाखांचा गंडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अॅमेझॉन या कंपनीची जाहिरात विविध व्हॉटसअॅप समूहात करण्याचे टास्क देऊन १८ लाख ५१ हजार ७८३ रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील फिर्यादी हे ७० वर्षीय जेष्ठ नागरिक असून घणसोली येथे राहतात. घणसोली येथे राहणाऱ्या एका निवृत्त ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकांच्या मुलीस एका अज्ञात क्रमांकावरून व्हीआयपी ४ अॅमेझॉन ग्लोबल रिक्रुटमेंट इंडिया या समूहात समाविष्ट केले. या समूहाचे प्रशासक माईक व समूहातील सर्वांनी संगनमत करीत एक पेड टास्क फिर्यादीच्या मुलीस दिले तसेच ५००० व्हीआयपी टास्क २२१५ या टेलिग्राम समूहात सहभागी होण्यास सांगण्यात आले. त्यानुसार फिर्यादी यांच्या मुलीने टेलिग्राम समूहात प्रवेश केला.



या ठिकाणी अॅमेझॉन कंपनीचे उत्पादनाची जाहिरात करून पैसे कमविण्याचे आमिष दाखवण्यात आले. सुरुवातीला पैसेही देण्यात आले, मात्र अधिक पैसे असतील तर अनामत रक्कम जमा केल्यास अधिक पैसे कमावू शकता असे आमिष दाखवण्यात आले. त्यासाठी विविध बँक खाते क्रमांक देण्यात आले.

घरबसल्या जाहिरात करून पैसे कमवावे या उद्देशाने फिर्यादी यांच्या खात्यातून पैसे भरले जाऊ लागले, मात्र वेळोवेळी अधिक पैशांचे आमिष दाखवून पैशांची मागणी होत राहिली. अशा २९ मे ते ६ जूनदरम्यान तब्बल १८ लाख ५१ हजार ७८३ रुपये फिर्यादी यांनी आरोपीच्या विविध खात्यात जमा केले आणि दिलेले टास्क सुद्धा पूर्ण केले, मात्र त्याचे पैसेच मिळत नसल्याने आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात संबंधित आरोपी विरोधात तक्रार दाखल केली त्या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी सायबर गुन्हे कलमान्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

अशा पद्धतीने फसवणूक करणारे नामवंत कंपनीच्या नावाचा वापर करतात मात्र प्रत्यक्षात फसवणूक करणाऱ्यांचा आणि संबंधित नामांकित कंपनीचा कुठलाही संबंध नसल्याचे अनेकदा समोर आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# नवी मुंबई पोलीस दलातील तीन अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस दलातील तीन पोलीस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पोलीस पदकाने तीन दिवसांपूर्वी राज्यपाल भवनात सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये नवी मुंबई पोलीस दलाचे गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक जितेंद्र मिसाळ तसेच पोलीस उपनिरीक्षक निघोट यांना पदक व सन्मानपत्राने गौरविण्यात आले आहे.



राज्याच्या गृहविभागाने २०२२ साली प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) राष्ट्रपती महोदयांनी गुणवत्तापुर्ण सेवेबद्दल पोलीस पदकाची घोषणा केली होती. या घोषणेनंतर पदक अलंकरण सोहळा ६ जून रोजी राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते पोलीस अधिकाऱ्यांना राज्यपाल भवनात पदक प्रदान करण्यात आले. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पदक विजेत्या पोलीस अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त लांडगे यांनी यापूर्वी वरिष्ठ पोलीस निरिक्षक सेवेत सोनसाखळी चोरीतील सराईत चोरट्याला पोलीस पथकासह गोळीबार करुन पकडले होते. तसेच आंतरराज्य तांदुळ घोटाळा लांडगे यांनी उघडकीस आणला होता.

कळंबोली येथील बॉम्ब प्रकरणासह, पोलिसाची हत्या करुन त्याचा अपघाताचा बनाव केल्याप्रकरणाची त्यांनी उकल केली होती. अशा अनेक उल्लेखनीय तपासामुळे त्यांचा सन्मान करण्यात आल्याची माहिती नवी मुंबई पोलीस दलाकडून देण्यात आली.

# 'ग्रामसंवर्धन'तर्फे बालग्राम प्रकल्पातील बालकांना साहित्य

**खारघर : प्रतिनिधी**

ग्राम संवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडी पनवेल संचलित अनाथ, आदिवासी, गरजू, गरीब आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील वंचित बालकांसाठी चालविलेल्या जाणाऱ्या बालग्राम प्रकल्पातील बालकांना शैक्षणिक वर्षात लागणाऱ्या वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल्स, छत्र्या रेनकोट यासह मासिक धान्य व गृहोपयोगी साहित्य वाटप रविवारी (दि. ९) करण्यात आले.



या वेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित आर्ट्स, कॉमर्स कॉलेज पेण येथील प्रा. लक्ष्मण कुमारे, साई गावचे रूपेश मोकल, कराटे प्रशिक्षक केवल मोकल, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, बालग्राम मित्र राजू पाटील, सतीश मोकल, सचिन पाटील, मानसी पाटील व बालग्राम पालक उपस्थित होते.

बालग्राममधील बालकांनी या वेळी हर गर्लफ्रेंड आहे हे पथनाट्य सादर केले. दरम्यान, कोकण कट्टा विलेपार्ले, तांदूळ, डाळ, ट्रेंड नर्सेस असोसिएशन ऑफ इंडिया शाखा महाराष्ट्राच्या अनिता हांडे, वह्या, छत्र्या, रेनकोट एकता सामाजिक संस्था कामोठेचे अमोल शितोळे, वह्या, कडधान्य, ग्राम संवर्धनचे विश्वस्त चारुदत्त पाटील, मासिक धान्य साहित्य व चिल्ड्रन फ्युचर ऑफ इंडिया रायगड शाखा यांनी बालकांसाठी शैक्षणिक साहित्य दान स्वरूपात दिले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालग्राम मित्र राजेश रसाळ यांनी केले तर आभार बालग्राम बालिका गिंजल म्हात्रे हिने मानले.

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचची विशेष बैठक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचची सोमवारी (दि. १०) विशेष बैठक झाली. अध्यक्ष विवेक मोरेश्वर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष बैठकीच्या सुरुवातीला पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

पनवेलच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणारे साप्ताहिक श्रीविद्याचे संस्थापक संपादक केशव विनायक केळकर आणि त्यांचे चिरंजीव शशिधर केळकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना मंचच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संस्थेचे सन्माननीय सदस्य तथा सल्लागार अविनाश कोळी यांना सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळ्यात आमंत्रण प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनचा ठराव पारित करण्यात आला.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या सन्माननीय सदस्या तृप्ती पालकर यांची एनडीटीवी या वृत्तवाहिनीवर अँकर म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. यानंतर अध्यक्ष विवेक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तर सल्लागार माधव पाटील आणि डॉ. संजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सभेचे कामकाज झाले. यामध्ये मंचमध्ये समाविष्ट होण्यासाठी आलेल्या अर्जांवर साधक-बाधक चर्चा करण्यात आली. आगामी काळातील सामाजिक उपक्रमांचे नियोजन व त्याचे कॅलेंडर बनवण्यात आले.

लवकरच पनवेल तालुका पत्रकार विकास मंच हा पश्चिम किनारपट्टीवरील नागरिकांची मान्सूनपूर्व तयारी या विषयाचा अभ्यास करण्यासाठी स्टडी टूर आयोजित करणार असल्याचे अध्यक्ष विवेक पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांवर चर्चा झाल्यानंतर बैठकीची सांगता झाली.

या बैठकीला अध्यक्ष विवेक मोरेश्वर पाटील, सल्लागार ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, सल्लागार डॉ. संजय सोनवणे, उपाध्यक्ष संजय कदम, माजी सरचिटणीस मंदार दोंदे, प्रवीण मोहोकर, भरत कुमार कांबळे, राजू गाडे आदी उपस्थित होते.

# मोहोपाड्यातील वीज समस्या लागणार मार्गी; महावितरणकडून कामे सुरू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीत वीजेच्या समस्या निर्माण होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे मोहोपाडा, रसायनी, आपटा परीसरामधील नागरिकांमध्ये तीव संताप दिसून येत होता. महावितरणाने याची गांभीयाने दखल घेत पनवेल ग्रामीण उपविभागांतर्गत मोहोपाडा, रसायनी परीसरात तांत्रिक सुधारणांची कामे हाती घेतलेली असून ती समाधानकारकपणे पूर्ण होत आहेत.

यात २२० केव्हीचे जाळे विस्तारीत करणे, १८ किमी नवीन उच्चदाब वाहिनी टाकणे उणे १० किमी. जूने कंडक्टर बदलणे, रोहित्र व शहरातील लघुदाब वाहिनेचे जुणे पोल काढून त्याजागी नवीन पोल लावणे. आठ किमी लघुदाबवाहिनी जूने करकटर बदलणे. वितरण प्रणालीमध्ये अडथळा आणत असलेल्या झाडांच्या फांदयाची छाटणी करणे, चीन इन्यू लेटर्स बदलणे आदी कामाचा समावेश असून कार्यकारी अभियंता लटपटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकार्यकारी अभियंता राखसाहेब, सहाय्यक अभियंता गलांडे, कांबळे यांनी विजेला अडसर ठरणाऱ्या समस्या मार्गी लावण्यासाठी परिश्रम घेतले.



मोहोपाडा विजवितरण कार्यालयांतर्गत सहाय्यक अभियंता गलांडे यांच्याकडून परिसरात विजसमस्येवर तोडगा काढला जात असल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# शिक्षक संघटनेचा पर्यावरणपूरक उपक्रम

## ५० हजार झाडे लावून जगवण्याचा निर्धार

**कळंबोली : बातमीदार**

पर्यावरण संरक्षणासाठी या पावसाळ्यात महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेने राज्यात ५० हजार झाडे लावून त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार केला. कणकवली संघटनेच्या राज्य कार्यकारिणी सभेत हा ठराव संमत करण्यात आला. महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची राज्य कार्यकारिणी सभा कणकवली येथे राज्य नेते विजय भोगेकर यांचे उपस्थितीत नुकतीच झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील होते.

बैठकीत निसर्गातील वाढते तापमान व बेसुमार होणारी वृक्षतोड यामुळे निसर्गाचे संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचे मत बैठकीत उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. बैठकीत शिक्षकांची रिक्त पदे १०० टक्के भरावीत, संच मान्यतेचे अन्यायकारक निकष रद्द करावेत, बालकाच्या मोफत शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार पाचवी व आठवीचे वर्ग विनाअट जिल्हा परिषद शाळेस जोडावेत, सहावी ते सातवी अथवा सहावी ते आठवीच्या वर्गांना विनाअट तीन शिक्षक मंजूर करावेत, आंतरजिल्हा सातवा टप्पा लवकरात लवकर सुरू करावा, आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना तत्काळ मुक्त करावे, जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना शिपाई पद मंजूर करावे, सर्व केंद्र शाळांना क्लार्कचे मंजूर करावे, शालेय पोषण आहार स्वतंत्र यंत्रणेकडे द्यावा, जून व डिसेंबरमध्ये वर्षातून दोन वेळा पदोन्नती घेण्याचे निर्देश सर्व जिल्हा परिषदांना व्हावेत, नवीन भरतीतील उमेदवारांना लवकरात लवकर नियुक्ती देण्याचे निर्देश. व्हावेत आदी मागण्यांचे ठराव संमत करण्यात आले.

बैठकीस विजय भोगेकर, हरिश ससनकर, प्रकाश पाध्ये, जी एस मंगनाळे, शारदा वाडकर, प्रकाश पाटील, रंगराव वाडकर, प्रमिला माने, सुरेश साळवी, अविनाश म्हात्रे, गोविंद पाटील, वसंत मोकल, विश्वास ठाकूर, सुनील देशमुख, विकास गायकवाड, शंकर ठाकूर, प.शि. म्हात्रे, दत्तात्रेय भोंडकर, सचिन जाधव, एस.के. पाटील, किशोर आनंदवार, इरफान मिर्झा, महेंद्र हिवे, यशवंत पेंढारकर, संघर्ष सावरकर, प्रकाश वाडकर, प्रदिप पवार, तुषार पाटील, गंगाधर बोढे, संभाजी पाटील, नितीन पेढेकर, जीवन भोयर आदी उपस्थित होते.

सभेच्या सुरूवातीला सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष सचिन जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तर आभार संधुदुर्ग जिल्हा नेते अशोक जाधव यांनी माणरे, सभेचे सुत्रसंचलन राज्य सरचिटणीस हरिश ससनकर यांनी केले.

# जुईनगरमध्ये पर्यावरण दिनी वृक्षतोड

**नवी मुंबई : बातमीदार**

आजकालच्या व्यस्त जीवनात पर्यावरणासाठी निसर्गाचा समतोल राखण्यासाठी नागरिकांना वेळ नसतो. यामुळेच अनेक सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी, दक्ष नागरिक वर्षातून एकदा ५ जून पर्यावरण दिनानिमित्त झाडे लावून छोटासा हातभार पर्यावरणासाठी लावतात, परंतु यावर्षी याच दिवसाचे निमित्त साधून वृक्षतोड करण्याचे लज्जास्पद कृत्य जुईनगर, सेक्टर २५मधील पारिजात सोसायटीत करण्यात आले आहे.

पारिजात गृहनिर्माण संस्थेमध्ये सध्या कोणतीही कमिटी पदावर कार्यरत नसून प्रशासकाच्या हाती पूर्ण कारभार आहे. पारिजात सोसायटीच्या आवारातील झाडे ही रीतसर फांद्या छाटणीसाठी पालिकेकडून परवानगी घेण्यात आली होती. असे असूनही सोसायटीतील काही सदस्यानी फांद्या छाटणीचे निमित्त साधून



झाडांच्या मुळां, फांद्या, झाडावरील पक्ष्यांची घरटी यांची कोणतीही परवाह न करता अशी ४०- ४५ झाडे निर्दयीपणे कत्तल करण्यात आली. यापूर्वीही असे कृत्य या सोसायटीतील काही ठराविक सदस्यांद्वरे वारंवार करतानाची बाब आढळली आहे.

निसर्गाची अशी हानी करण्याचा प्रकार समोर आला असून सोसायटीतील रहिवासी व पर्यावरणप्रेमी आबा रणवरे तसेच सोसायटीतील इतर काही रहिवासी या कृत्याच्या विरोधात पुढे येऊन त्याची तक्रार करण्याचे पाऊल उचलले आहे.

विभाग अधिकारी अमोल पालवे यांना आबा रणवरे यांनी प्रत्यक्ष भेटून या कृत्याची माहिती दिली व तक्रार नोंदवली. त्यावेळी त्यांनी छायाचीत्रांद्वारे त्या आवारातील वृक्षतोडीपूर्वी असलेली झाडे त्यावर असलेली पक्षांची घरटी यांचे अस्तित्व आणि सध्याचे वृक्षतोडीनंतरचे मृत अवस्थेतील झाडांच्या अवशेष याचा पुरावा सादर केला. आणि त्याचबरोबर या प्रकरणाची सखोल चौकशी करून हा गुन्हा करणाऱ्यांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

# आगरी भाषा सौंदर्य पुस्तकाचे प्रकाशन



**नवी मुंबई : बातमीदार**

कवी, लेखक, नाटककार गजआनन म्हात्रे यांच्या आगरी भाषा सौंदर्य पुस्तकाचे प्रकाशन म्हात्रे ६०व्या वाढदिवसानिमित्त नेरूळ येथील ठाकुर हॉलमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

या प्रकाशन सोहळ्यात साहित्यिक प्रमोद कर्नाड, रायगड भूषण एल.बी. पाटील, अविनाश पाटील, देविदास पोटे, कौमुदी गोडबोले, रवी वाडकर, अनुपमा उजगरे हे उपस्थित होते.

या वेळी लोकनेते दि.बा. पाटील चळवळ स्पर्धा नवी मुंबईच्या वतीने गजआनन म्हात्रे यांना नवी मुंबई साहित्य भूषण पुरस्कार माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या हस्ते देण्यात आला.

वाढदिवसानिमित्त गजआनन म्हात्रे यांच्या हस्ते कुसुमाग्रज वाचनालय नेरूळ, माणिकराव कीर्तने वाचनालय वाशी, टाऊन लायब्ररी वाशी, कॉ. रणदिवे वाचनालय आग्रोळी बेलापूर या चार वाचनालयांना पुस्तके भेट देण्यात आली.

गजआनन म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त रंगधनु नवरंग साहित्य संमेलन नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळाने आयोजित केले होते. या संमेलनात पुस्तक प्रकाशन, सत्कार, परिसंवाद, कवीसंमेलन पार पडले. या एकदिवसीय साहित्य संमेलनात मुंबई, पुणे, कर्जत, अलिबाग, नवी मुंबईतील साहित्य प्रेमींनी सहभाग घेतले.

या संमेलनाचे सूत्रसंचालन महेंद्र कोंडे, घनश्याम परकाले, सुदेश जगताप यांनी केले. या साहित्य संमेलनात नवी मुंबईतील अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली.



# बामणदेवमध्ये मैदानात वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ नोडमधील पर्यावरणप्रेमी मित्र मंडळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युगांतर मित्र मंडळाकडून नेरूळ पश्चिममधील सेक्टर २४ परिसरातील बामणदेव झोटिंगदेव मैदान परिसरात रविवारी (दि. ९) सकाळी वृक्षारोपण करण्यात आले.

गेल्या १२ वर्षांपासून युगांतर मित्र मंडळाकडून नेरूळ नोडमध्ये वृक्षारोपणाचे कार्य केले जात असून वृक्षारोपणाबरोबरच रोपण केलेल्या वृक्षांचे संर्वधनही या मंडळाकडून करण्यात येत आहे. आतापर्यत ५०० हून अधिक वृक्षांचे त्यांनी रोपण, जतन व संर्वधन या मंडळाकडून करण्यात आले आहे. रविवारी सकाळी वृक्षरोपण केलेल्या झाडांचे संवर्धन करण्याची जबाबदारी रविंद्र भगत, दर्शन म्हात्रे, श्रीकांत ठाकूर, हेमंत ठाकूर, रुणाल सुर्वे, मयूर पवार यांनी घेतली.

पर्यावरणाचे संतुलन ठेवण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन करणे काळाची गरज बनली आहे. वृक्षारोपण हे फोटोसेशन पुरता मर्यादित न ठेवता प्रत्यकाने एक झाड लावून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी घेतली पाहिजे, असे आवाहन युगांतर मित्र मंडळाचे अध्यक्ष रवींद्र भगत यांनी या वेळी केले.

# घणसोली सेक्टर ४ येथील बेघर निवारा केंद्र कार्यान्वित

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेमार्फत दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत १५ मार्च, २०२४ पासून प्लॉट क्रमांक २४०, सेक्टर ४, घणसोली येथे बेघर निवारा केंद्र सुरू करण्यात आलेले आहे.

या बेघर निवारा केंद्राची क्षमता १०३ लाभार्थी इतकी असून याठिकाणी बेघर व्यक्तींसाठी चहा, नाष्टा, दोन वेळचे जेवण, क्वागार्ड मशीनचे पिण्याकरिता पाणी, गादी, उशी, चादर, सामान ठेवण्यासाठी लॉकर तसेच मनोरंजनाकरिता टि. व्ही. संच इत्यादी साहित्य विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या केंद्रामध्ये पुरूष, महिला, दिव्यांग व्यक्ती व वृद्ध यांच्याकरिता राहण्याची स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध आहे.

या बेघर निवारा केंद्राची संपूर्ण माहिती पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि महानगरपालिकेच्या आठही विभागांचे विभाग अधिकारी यांना देण्यात आलेली आहे.



नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात कोणीही बेघर रस्त्यावर राहू नये यादृष्टीने रस्त्यावर बेघर व्यक्ती, (वृद्ध, महिला, मुले व दिव्यांग व्यक्ती) आढळून आल्यास त्याची माहिती नमुंमपा समाज विकास विभागातील राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचे व्यवस्थापक तुषार पवार यांस ९८८१६३६१६८ अथवा आस्था सामाजिक विकास सेवा संस्थेचे व्यवस्थापक राहुल वाढे यांस ८६६९३९३३०९ या क्रमांकावर संपर्क साधून द्यावी, असे जाहीर आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

निवडक



## पतसंस्थेतर्फे सभासदाला सहाय्य

**माणगाव** : ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेतर्फे संस्थेच्या सभासद कल्याण निधीतून आजारी सभासदास औषोधोपचाराकरीता आर्थिक सहाय्य देण्यात आले. संस्थेचे सभासद शैलेश दगडू बामणे यांना नुकताच पॅरालिसिसचा आजार आला होता. त्यांच्या निवासस्थानी जाऊन संस्थेचे चेअरमन आनंद यादव, संचालक दिलीप जाधव, संचालक नरेश राजपूत,संचालक संदीप खरंगटे, संचालक उदय म्हशेलकर, संचालक अरुण प्रभाळे यांच्या हस्ते व संस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, लेखनिक राजेंद्र जाधव यांच्या उपस्थितीत देण्यात आला.

## सार्वजनिक वाहनांची पासिंगसाठी धडपड

**श्रीवर्धन** : सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना आरटीओकडून वाहनांचे पासिंग करून घ्यावे लागते, परंतु यासाठी सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना आपापली वाहने घेऊन पेण तालुक्यातील जिते येथे जावे लागते. तीनचाकी रिक्षाचालकांना श्रीवर्धन येथून जिते येथे जाणे अत्यंत त्रासदायक ठरत आहे. याकरिता उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचे कार्यालय माणगावसारख्या मध्यवर्ती ठिकाणी आल्यास अथवा निदान वाहनांच्या पासिंगची व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



**मुरूड : शहरात पावसाला सुरुवात झाली तरीदेखील नालेसफाईची कामे सुरूच आहेत. यामुळे पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी व कचरा येण्याची शक्यता आहे.** (छाया : संजय करडे)

# मुरुड परिसरातील शिडाच्या बोटी स्थिरावल्या

## पावसाळ्यात जंजिरा किल्ला बंद असल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न

**मुरूड : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध ऐतिहासिक जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी बंद केल्यामुळे किल्ल्यावर जाण्यासाठी असणाऱ्या बोटी सध्या किनारी भागात स्थिरावल्या आहेत. यामुळे मात्र बोटीवरील कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत असतो. याबाबत शासनाने गांभिर्याने विचार करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेटीवरून १५ शिडांच्या बोटी तैनात असतात. एका बोटीवर सहा कर्मचारी कार्यरत असून येणाऱ्या पर्यटकांना किल्ल्यापर्यंत सुरक्षित नेत असतात, परंतु किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात आल्याने येथील लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सर्व बोटी किनाऱ्याला लावण्यात आल्या आहेत. जंजिरा किल्ल्याच्या सभोवताली असणारे गॉगल्स विक्रेते, शहाळी, सरबत, टी स्टॉल सर्वांचे व्यवसाय पावळ्याच्या दिवसात बंद असल्याने त्यांच्याही उदरनिर्वाहाचा



प्रश्न उपस्थित होत आहे.

मुरूड तालुका हा पर्यटन तालुका असल्याने येथे वर्षाला पाच लाख पर्यटक काशीद समुद्रकिनारा, ऐतिहासिक जंजिरा किल्ला, मुरुड समुद्रकिनारा पाहण्यासाठी येत असतात, परंतु पावसाळ्याच्या दिवसात समुद्राला येणारे उधाण, अतिवृष्टी यामुळे संभाव्य धोका लक्षात घेऊन सर्व प्रकारची जलवाहतूक बंद करण्यात येते. याचा थेट परिणाम त्यावर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांवर होतो. पर्यटक येत आहेत, परंतु किल्ला बंद केल्यामुळे पर्यटक नाराज होऊन माघारी परतत असल्याचे दिसून येत आहे.

## रोह्यात पावसाच्या आगमनाने नागरिकांसह बळीराजा समाधानी

**रोहे : प्रतिनिधी**

रोहेकर नागरिक व शेतकरी आतुरतेने वाट पाहत असलेल्या वरूणराजाने अखेर शनिवारी मध्यरात्री रोह्यात हजेरी लावली. त्यामुळे उकड्याने हैराण नागरिकांसह बळीराजालाही दिलासा मिळाला आहे.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात शनिवारी मध्यरात्री पाऊस पडला. संध्याकाळपासूनच पावसाची रिमझिम चालू होती. रविवारी मात्र दिवसभर ढगाळ वातावरण होते. पडलेल्या पावसामुळे शेतकरी उत्साही झाला असून त्याने शेतीच्या कामाला वेग दिला आहे, तर शहरासह ग्रामीण भागात दुकाने, घरे, वाडे झाकण्यास सुरुवात झाली आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या ताडपत्री, प्लास्टिक विकत घेण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत.



## बेदरकार चालकांवर पोलिसांची कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे.

रविवारी (दि.९) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३३५ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ३८ हजार रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या धडक कारवाईने नियम मोडणाऱ्या वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# शैक्षणिक दाखले घेण्यासाठी सेतू सुविधा केंद्रात गर्दी

**चौक : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी लागणारे विविध दाखले घेण्यासाठी खालापूर सेतू सुविधा केंद्रात गर्दी सुरू झाली आहे.

इयत्ता दहावी, बारावी परीक्षांचे निकाल लागले आहेत. वैद्यकिय, विधी, अभियांत्रिकी विभागात प्रवेश घेण्यासाठी आणि ११वी किंवा प्रथम वर्ष उच्च शिक्षण घेण्यासाठी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची आपल्या पालकांसमवेत लगबग सुरू झाली आहे. जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, पडताळणी प्रमाणपत्र व अन्य लागणारे प्रमाणपत्र हे तालुका सेतू सुविधा केंद्रातून




उपलब्ध होतात.

दोन दिवसांच्या कार्यालयीन सुट्टीनंतर सोमवारी सेतू सुविधा केंद्रात विद्यार्थी आणि पालकांनी तहसील आवारातील कार्यालयात गर्दी केली होती.

सर्व कागदपत्रांची पूर्तता सेतू सुविधा केंद्रात केल्यावर तत्काळ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते, शिवाय या कागदपत्रांसाठी शिबिर आयोजित करण्यात आली असून त्याचाही लाभ घ्यावा, असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.

# स्तन, गर्भाशय मुखाच्या कर्करोगासंदर्भात तपासणी शिबिर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड मेडिकल असोसिएशन मदरहूड हॉस्पिटल खारघर व प्राथमिक आरोग्य केंद्र पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग या संदर्भात रविवारी (दि. ९) आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे लवकरात लवकर निदान करण्याकरिता आवश्यक असलेली पॅप स्मिअर चाचणी तसेच, मुली व स्त्रियांमध्ये होणाऱ्या स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी समुपदेशन करण्यात आले, तसेच उपस्थित मुली व महिला



यांची त्याअनुषंगाने आरोग्य तपासणी करण्यात आली.

आरएमएचे कार्यवाह डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सादर केली. अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले यांनी उपस्थित महिलांना आरोग्य मार्गदर्शन केले. या शिबिरात सुमारे ७७ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. त्यापैकी १६ महिलांच्या पॅप स्मिअर टेस्ट्स झाल्या. मदरहूड हॉस्पिटल येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. श्रुती माने व डॉ. श्रुती उगरण यांनी गर्भशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग यासंदर्भात आपले विचार मांडले.

पोयनाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पद्मश्री अंधेळकर, डॉ. औदुंबर कोळी व डॉ. स्मितल पाटील यांनी समन्वयक म्हणुन हातभार लावला, तर डॉ. सुनीता पाटील, डॉ. रेखा म्हात्रे, डॉ. ओंकार पाटील यांनी व आरोग्य केंद्रातील पर्यवेक्षकांनी रुग्णनोंदणीसाठी मदत केली.

## रायगडात पावसाच्या हजेरीने हवेत गारवा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल्या तीन ते चार दिवसांमपासून रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना हवेत गारवा निर्माण झाल्यामुळे दिलासा मिळाला आहे.

जून महिन्याच्या सुरुवतीपासूनच पाऊस हुलकावणी देत असल्याने हवेतील उष्णता कायम होती, मात्र पावसाच्या आगमनाने हवेत गारवा निर्माण झाला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM e-Tender Notice No. 01/2024-25**

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 01/2024-25 | 7000031264 | Providing services of 6 nos of skilled labour at EHV CCCM DN Panvel, EHV CCCM Sub-Dn Panvel, Kharghar, Kalyan at EHV CCCM Dn Panvel for FY 2024-25.(01.07.2024 to 31.03.2025) | 1457341.00 |
| 02/2024-25 | 7000031311 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Executive Engineer(Civil), EHV CCCM Dn Panvel(Annual Contract) for the year 2024-25. .(01.07.2024 to 31.03.2025) | 443794.00 |
| 03/2024-25 | 7000031031 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Panvel (Annual Contract) for the year 2024-25. .(01.07.2024 to 31.03.2025) | 442544.00 |
| 04/2024-25 | 7000031033 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Kharghar (Annual Contract) for the year 2024-25. .(01.07.2024 to 31.03.2025) | 445415.00 |
| 05/2024-25 | 7000031034 | Hiring of light motor vehicle (L.M.V) having tourist permit for the office of the Addl. Executive Engineer(Civil), EHV CCCM SDn Kalyan (Annual Contract) for the year 2024-25. (01.07.2024 to 31.03.2025) | 444347.00 |
| 06/2024-25 | 7000031353 | Annual civil maintenance works at 220KV ONGC, 100KV Jite,100KV Patalganga,100KV Bhokarpada, Takka premises, Kalamboli Colony, Bhingari premises and 220KV Wadkhal for F.Y.2024- 25. | 2230961.00 |
| 07/2024-25 | 7000031116 | Annual civil maintenance works for Nerul/Uran/Taloja-I & Taloja-II substations along with colony with other civil works for F.Y 2024-25. | 2008525.00 |
| 08/2024-25 | 7000031117 | Annual civil maintenance works for 400KV Kharghar substation along with other civil works for the F.Y 2024-25. | 2043589.00 |
| 09/2024-25 | 7000031115 | Annual civil maintenance works for Roha/Mahad/100KV Thal substation Mhasala colony along with colony other civil works for F.Y 2024-25. | 2073410.00 |
| 10/2024-25 | 7000031114 | Annual civil maintenance works for Wasamabe Colony/220KV Apta/200KV Tambati/100KV Khopoli S/stn along with colony with other civil works for F.Y 2024-25. | 1999441.00 |
| 11/2024-25 | 7000031276 | Annual civil maintenance contract for 400KV Nagothane Substation civil works for year FY 2024-25. | 1604702.00 |
| 12/2024-25 | 7000031308 | Annual civil maintenance contract for Mohane, Murbad,Shahapur, Technocraft Murbad, Centuryreon Ulhasnagar Jindal Vashind substation, colony,offices under Kalyan S/Dn for year 2024-25. | 2038754.00 |
| 13/2024-25 | 7000031275 | Annual civil maintenance contract for 220KV Kandalgaon substation with colony and 220KV Vilebhagad substations for civil works for year FY 2024-25. | 1710948.00 |
| 14/2024-25 | 7000031274 | Annual civil maintenance contract for Dombivali, Dombivali Pal, Morivali, Anandnagar, Jambhul, Neral, Palava substation, colony, offices under Kalyan S/Dn for year 2024-25. | 2038754.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: www.mahatransco.in.
Contact person: Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325

SD/-
Executive Engineer (Civil), Panvel.

# पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाल्यानंतर जल्लोष

**नागोठणे : बातमीदार**

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानाची शपथ घेतल्याने नागोठण्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून चौकात फटाक्यांची आतषबाजी केली व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच आज भारताला संपूर्ण जगात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारत देश न भूतो ना भविष्याती अशी प्रगती करणार असल्याचा विश्वास नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी व्यक्त केला.

नागोठण्यात साजरा करण्यात आलेल्या आनंदोत्सवात जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी, गौतम जैन, अशोक अहिरे, धनराज



उमाळे, शेखर गोळे, तीरत पोलसानी, अंकुश सुटे, सोनाली पडवळ, अपर्णा सुटे, पवन जगताप, सुरेश येरुणकर, विवेक रावकर, राजेंद्र लवटे, गौतम जैन, विठोबा माळी, सुदर्शन कोतकर, सुरेश जैन, अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष रऊफ कडवेकर, जावेद दापोळकर, सगीर पानसरे, प्रमोद नागोठणेकर, गणेश घाग, शिवसेनेचे विभाग प्रमुख प्रवीण ताडकर, शहर अध्यक्ष अमित खामकर यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील ऐतिहासिक श्रीराम मारुती चौक येथे भाजपकडून स्क्रीनवर शपथविधी सोहळा पाहण्यासाठी नियोजन करण्यात आले होते, तसेच बाजारपेठ, तीनबत्ती नाका, नगरपालिका चौक येथे प्रत्येक नागरिकास बुंदी, पेढे वाटप करून ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

पंतप्रधान मोदीजींच्या विकसित भारताच्या संकल्पनेला भारतीय मतदारांनी तसेच रोहा तालुक्यातील मतदारांनी मतदान केल्याबद्दलसुद्धा



भाजपने नागरिकांचे धन्यवाद मानले.

या आनंदाच्या कार्यक्रमास रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग तसेच युवामोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, सुमित रिसबूड, रोहा शहराध्यक्ष यज्ञेश भांड, ज्येष्ठ नेते सनल कुमार, दक्षिण रायगड चिटणीस श्रद्धा घाग, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस जयश्री भांड, ज्येष्ठ कार्यकर्ते विनायकजी बेडेकर, वसंत शेलार, सोशल मीडिया जिल्हा संयोजक सनील इंगवले, सागर ओक, सीमा कोनकर, संस्कृती ओक, दक्षिण रायगड युवा वॉरिअर संयोजक वैभव कुलकर्णी, दादा कुळकर्णी, रोहा तालुका महिला मोर्चा सरचिटणीस रिया कासार, ज्योती सनलकुमार, राकेश चाफेकर, अनिल घरजाळे, निखिल बोरोले दिनकर खरविले आदी उपस्थित होते.

# पाकवर विजयासह भारताचा विश्वविक्रम

## लहान धावसंख्येचा यशस्वी बचाव

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी चित्तथरारक सामना पहायला मिळाला. या सामन्यात शेवटच्या षटकापर्यंत कोणत्याही संघाचा विजय निश्चित दिसत नव्हता, मात्र अखेरच्या षटकात भारतीय संघाने पाकिस्तानचा सहा धावांनी पराभव केला. या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. जसप्रीत बुमराह, ऋषभ पंत आणि अर्शदीप सिंग यांनी योगदान दिले. त्याचबरोबर संपूर्ण संघाने क्षेत्ररक्षण करताना चांगली कामगिरी केली. पाकिस्तानविरूद्ध विजयाची नोंद करून भारताने एक मोठा विक्रम केला आहे.



पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना ११९ धावा केल्या होत्या. भारताकडून फक्त ऋषभ पंत चांगली फलंदाजी करू शकला. त्याने ४२ धावांची शानदार खेळी खेळली. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानी संघाने १० षटकांत एक गडी गमावून ५७ धावा केल्या होत्या. त्यामुळे भारताला विजय मिळवणे कठीण वाटत होते. त्यानंतर भारतीय गोलंदाजांमुळे संघाने सामन्यात जोरदार पुनरागमन केले आणि पाकिस्तानी संघ २० षटकांत केवळ ११३ धावाच करू शकला. अशा प्रकारे भारताने हा सामना सहा धावांनी जिंकला.

पाकिस्तानविरुद्ध भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराह संघासाठी सर्वांत मोठा 'गेम चेंजर' ठरला. त्याने भारतीय संघासाठी चार षटकांत केवळ १४ धावा दिल्या आणि तीन विकेट्स घेतल्या. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. हार्दिक पंड्याने दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय अक्षर पटेल आणि अर्शदीप सिंगच्या खात्यात प्रत्येकी एक विकेट गेली.

भारतीय संघाने पाकिस्तानसमोर १२० धावांचे लक्ष्याचा यशस्वीपणे बचाव केला. याआधी भारताने २०१६मध्ये झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० सामन्यात १३९ धावांच्या लक्ष्याचा बचाव केला होता, पण आता भारताने स्वतःच्याच कामगिरीला मागे टाकले आहे.

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वांत कमी धावसंख्येचा संयुक्तपणे बचाव करणारा संघही भारत ठरला आहे. २०१४मध्ये श्रीलंकेच्या संघाने न्यूझीलंडविरुद्ध ही कामगिरी केली होती. टी-२० विश्वचषक स्पर्धेत १२० धावांपेक्षा कमी लक्ष्याचा बचाव करण्यात फार कमी संघांना यश आले आहे.

### एका संघाविरुद्ध सर्वाधिक विजय

टी-२० विश्वचषकातील भारत-पाकिस्तान संघांमधील हा आठवा सामना होता. यादरम्यान भारताने पाकिस्तानचा पराभव करीत विक्रमी सातवा विजय मिळवला. यासह भारत टी-२० विश्वचषकात एका संघाविरुद्ध सर्वाधिक सामने जिंकणारा संघ बनला आहे. या यादीत पाकिस्तान आणि श्रीलंकेचे संघ दुसऱ्या स्थानावर आहेत. पाकिस्तानने बांगलादेशविरुद्ध सहा सामने जिंकले आहेत, तर श्रीलंकेनेही सहा वेळा वेस्ट इंडिजचा पराभव केला आहे.

# हार्दिक पांड्याने रचला इतिहास

## टी-२०मध्ये पाकिस्तानविरुद्ध सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील १९व्या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानचा सहा धावांनी रोमहर्षक पराभव केला. दमछाक करणाऱ्या या सामन्याचा निकाल शेवटच्या षटकात लागला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने पाकिस्तानी संघाला १२० धावांचे लक्ष्य दिले होते. यानंतर पाकिस्तानी संघ २० षटकांत ७ बाद केवळ ११३ धावा करू शकला. या सामन्यात हार्दिक पांड्याने जसप्रीत बुमराहला शानदार साथ दिली. या दरम्यान हार्दिकने दोन विकेट्स घेत पाकिस्तानविरुद्ध एक मोठा विक्रम केला आहे.



भारतीय संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्याने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात चार षटके टाकली आणि २४ धावा देत दोन विकेट्स घेतल्या. यासह तो आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पाकिस्तानविरुद्ध सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय गोलंदाज बनला आहे. हार्दिक सर्व भारतीय गोलंदाजांना मागे टाकत पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे. आतापर्यंत त्याने पाकिस्तानविरुद्ध टी-२० सामन्यात एकूण १३ विकेट्स घेतल्या आहेत. दुसऱ्या क्रमांकावर भुवनेश्वर कुमार आहे. त्याच्या नावावर ११ विकेट्स आहेत. भारतीय संघाचा युवा गोलंदाज अर्शदीप सिंग तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने पाकिस्तान संघाविरुद्ध सात विकेट्स घेतल्या आहेत.

# पाकिस्तानच्या पराभवानंतर माजी खेळाडूंची संघावर टीका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताविरुद्ध टी-२० विश्वचषक झालेल्या सामन्यात पाकिस्तानच्या संघाला गुडघे टेकावे लागले. या पराभवानंतर पाकिस्तानच्या अनेक माजी खेळाडूंनी संघावर टीका केली आहे.

वासिम अक्रमने सामन्यानंतर स्टार स्पोर्ट्सशी बोलताना म्हटले की, पाकिस्तानचे काही खेळाडू १० वर्षांपासून क्रिकेट खेळत आहेत. त्यांना मी आता शिकवू शकत नाही. पाकिस्तानी खेळाडूंना वाटते की त्यांनी चांगली कामगिरी केली नाही, तर प्रशिक्षकांना काढून टाकले जाईल आणि त्यांना काहीही होणार नाही. प्रशिक्षक ठेवण्याची व संपूर्ण संघ बदलण्याची हीच वेळ आहे.

अक्रमने बाबर आझम आणि शाहीन शाह आफ्रिदी यांच्यातील समीकरणाविषयीही थेट भाष्य केले आहे. पाकिस्तानच्या कर्णधारपदात बदल झाल्यापासून आफ्रिदी आणि बाबर एकमेकांशी बोलत नाहीत, पण हे आंतरराष्ट्रीय क्रिकेट आहे. इथे तुम्हाला देशासाठी खेळायचे असते. ते जमत नसेल तर या खेळाडूंना घरी बसवा, असे अक्रम म्हणाला.

शोएब अख्तरने पाकिस्तानच्या खेळाडूंसाठी व्हिडीओ पोस्ट करताना लिहिले की, मला आता 'निराश आणि दुखावलेला' असे एक ऑटोमटेड कॅप्शनच करून घ्यायला हवे.

# भारताच्या रोमांचक विजयाचे 'हे' ठरले टर्निंग पॉईंट

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत झालेल्या रोमहर्षक सामन्यात भारताने पाकिस्तानचा सहा धावांनी धुव्वा उडवत आपले वर्चस्व कायम राखले. या सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघ ११९ धावांत गारद झाला. यानंतर १२० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करायला उतरलेल्या पाकिस्तान संघाला भारताच्या गोलंदाजांनी ११३ धावांवर गारद विजयावर शिक्कामोर्तब केले. या रोमांचक झालेल्या सामन्यात भारताच्या विजयाचे तीन मोठे महत्त्वाचे टर्निंग पॉइंट होते; अन्यथा पाकिस्तान संघाने भारतीय संघाला जवळपास पराभवाची धूळ चारलीच होती.

**ऋषभ पंतची महत्त्वपूर्ण खेळी**

ऋषभ पंतने पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० विश्वचषकातील दबावाच्या सामन्यात ४२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. पंतच्या ४२ धावांच्या या अनमोल खेळीने अखेर भारताच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली. पंतने ही अवघड खेळी अशा वेळी खेळली, जेव्हा भारताच्या विकेट एका टोकाकडून एका पाठोपाठ सतत पडत होत्या. पंतने अक्षर पटेलसह (२०) तिसऱ्या विकेटसाठी ३९ धावांची भागीदारी केली. अक्षर पटेल बाद झाल्यानंतरही पंतने एक टोक सांभाळत धावा केल्या. त्याच्या महत्त्वपूर्ण खेळीमुळे भारतीय संघाला ११९ धावांपर्यंत मजल मारता आली.

**बुमराह खरा 'गेमचेंजर'**

जसप्रीत बुमराहने भारताला पाकिस्तानविरुद्धच्या नीचांकी धावसंख्येच्या सामन्यात विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भारताचा धडाकेबाज वेगवान गोलंदाज बुमराहने पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० विश्वचषकाच्या सामन्यात जगाला दाखवून दिले की तो जगातील सर्वोत्तम गोलंदाजांपैकी का आहे. या सामन्यात त्याने पाकिस्तानचा खतरनाक फलंदाज मोहम्मद रिझवान (३१), कर्णधार बाबर आझम (१३) आणि इफ्तिखार अहमद (५) यांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्याचबरोबर बुमराहने आपल्या स्पेलमध्ये फक्त १४ धावाच खर्च केल्या. त्यामुळे भारतासाठी खरा 'गेमचेंजर' जसप्रीत बुमराह ठरला.



**रोहितचा आक्रमक बाणा**

पाकिस्तानविरुद्धच्या या कमी धावसंख्येच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाचा डाव १९ षटकांत ११९ धावांवर आटोपला. पाकिस्तान हा सामना सहज जिंकेल असे वाटत होते, पण रोहित शर्माने हार मानली नाही. कमी धावसंख्येच्या सामन्यातही रोहितने आपल्या आक्रमक नेतृत्व शैलीने हरलेल्या सामन्याचे विजयात रूपांतर केले. सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे रोहितने आपल्या वेगवान गोलंदाजांवर विश्वास दाखवला. जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्या आणि अर्शदीप सिंग यांनी रोहित शर्माच्या या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही.

# स्कॉटलंडच्या विजयाने गतविजेत्या इंग्लंडचे स्थान धोक्यात



**अँटिग्वा : वृत्तसंस्था**

स्कॉटलंडने ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेत ओमानवर दणदणीत विजय मिळवला. या विजयासह स्कॉटलंड ब गटात पाच गुण व २.१६४ अशा नेट रन रेटसह अव्वल स्थानावर आहेत. त्यांचा हा विजय गतविजेत्या इंग्लंडसाठी धोक्याची घंटा घेऊन आला आहे आणि आता त्यांच्यावर स्पर्धेबाहेर होण्याची नामुष्की ओढावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील ब गटात आज ओमान विरुद्ध स्कॉटलंड असा सामना सुरू झाला. प्रथम फलंदाजी करताना ओमानने दमदार फकटेबाजी केली. सलामीवीर प्रतिक आठवले याने मैदान गाजवले. त्याने ४० चेंडूंत पाच चौकार व दोन२ षटकारांसह ५४ धावा करताना स्कॉटलंडसमोर ७ बाद १५० अशी आव्हानात्मक धावसंख्या उभी केली. प्रतिक हा मुळचा नाशिकचा, परंतु त्याने ओमानमध्ये नोकरी करण्याचा निर्णय घेतला आणि तेथून क्रिकेटपटू बनण्याचे स्वप्न पूर्ण केले. अयान खानने ३९ चेंडूंत नाबाद ४१ धावांचे योगदान दिले. स्कॉटलंडकडून साफियान शरीफने दोन विकेट्स घेतल्या.

प्रत्युत्तरात ओमानचे गोलंदाज कमी पडले. स्कॉटलंडचा सलामीवीर जॉर्ज मुन्सीने चांगली फटकेबाजी केली. मिचेल जॉन्स १६ धावांवर माघारी परतल्यानंतर मुन्सी व ब्रँडन मॅकमुलेन यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६५ धावांची मॅच विनिंग भागीदारी केली. मुन्सी २० चेंडूंत दोन चौकार व चार षटकारांसह ४१ धावांवर माघारी परतला. कर्णधार रिची बेरिंगटन (१३) व मॅथ्यू क्रॉस (नाबाद १५) यांनीही विजयात योगदान दिले. ब्रँडन ३१ चेंडूंत नऊ चौकार व दोन षटकारांसह ६१ धावांवर नाबाद राहिला आणि स्कॉटलंडने १३.१ षटकांत तीन बाद १५३ धावा करून सामना जिंकला.

ब गटात स्कॉटलंडने तीन सामन्यांत दोन विजय मिळवून पाच गुणांसह अव्वल स्थानावरील पकड मजबूत केली आहे. इंग्लंडविरुद्धचा त्यांचा सामना पावसामुळे रद्द करावा लागला होता आणि दोन्ही संघांना १-१ गुण मिळाले होते. त्यानंतर इंग्लंडचा संघ काल ऑस्ट्रेलियाकडून हरला. त्यामुळे दोन सामन्यांत त्यांचा फक्त एक गुण झाला आहे.

इंग्लंडचा नेट रन रेट हा -१.८०० असा आहे आणि उर्वरित दोन सामन्यांत त्यांना ओमान व नामिबिया यांचा मुकाबला करावा लागेल. हे सामने त्यांना मोठ्या फरकाने जिंकावे लागतील.

# सिराजने फेकलेला चेंडू लागला रिझवानला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील टी-२० विश्वचषक सामन्यात रविवारी मोहम्मद सिराजच्या आक्रमक थ्रोने मोहम्मद रिझवानच्या हातावर जोरदार फटका बसला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

पाकिस्तानच्या डावाच्या सातव्या षटकात सिराजने थेट चेंडू फेकला व त्याला अपेक्षित होते की चेंडू स्टंपच्या दिशेने जाईल, कारण तेव्हा फलंदाज क्रीझवर नव्हता. मात्र चेंडू रिझवानच्या हाताला लागला आणि फाईन लेगला वळला. यामुळे पाकिस्तानच्या फलंदाजांना एक धाव पूर्ण करता आली. सिराजने रिजवानला चेंडू फेकण्याबाबत तत्काळ माफीही मागितली.

भारतीय क्रिकेट संघाच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध कामगिरी करत कमी आव्हान असूनही पाकिस्तानचा सहा धावांनी पराभव झाला. पाकिस्तानला विजय आवाक्यात असताना संघाने थोड्या थोड्या वेळेच्या अंतराने खूप सहज विकेट गमावल्या परिणामी ते लक्ष्य गाठण्यापासून सहा पाऊले मागे गेले.

# भारत जिंकताच रिंकू सिंग, खलील अहमद, आवेश खान भरस्टेडियममध्ये लागले नाचू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने टी-२० विश्वचषकात पाकिस्तानवर सहा धावांनी रोमांचक विजय मिळवून आपल्या दुसऱ्या विजयाचा आनंद साजरा केला. या विजयामुळे भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्येही मोठ्या आनंदाचे वातावरण पहायला मिळाले. सर्वसामान्यांप्रमाणे फलंदाज रिंकू सिंग, गोलंदाज खलील अहमद आणि आवेश खानदेखील स्टेडियममध्ये उपस्थित होते. भारतीय संघ जिंकताच त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. या तिघांच्या जंगी सेलिब्रेशनचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.





रिंकू सिंगव्यतिरिक्त आवेश खान आणि खलील अहमद भारतीय राखीव संघाचा भाग आहेत. यामुळे तिघेही भारत-पाकिस्तान सामना पाहण्यासाठी न्यूयॉर्कच्या स्टेडियममध्ये उपस्थित होते. पाकिस्तानविरुद्ध भारताने विजय साकारताच तिघेही भरस्टेडियममध्ये उभे राहून आनंदाने जोरजोरात ओरडत, हसत, नाचत सेलिब्रेशन करताना दिसले. कॅमेऱ्याकडे 'ऐ जीत गये' म्हणत आनंदाने हसताना दिसले, तर त्याचवेळी रिंकू सिंग मैदानावरील दृश्य आपल्या मोबाइलवर रेकॉर्डिंग करीत होता.

दरम्यान, २०२४च्या टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची निवड झाली. त्यात १५ सदस्यीय संघात रिंकू सिंगचा समावेश नव्हता. त्याला ट्रॅव्हलिंग रिझर्व्हमध्ये ठेवण्यात आले होते. आयपीएलमध्ये फिनिशर म्हणून त्याने चांगली कामगिरी केली होती, मात्र रिंकूऐवजी शिवम दुबेला संधी देण्यात आली, जो आतापर्यंत फ्लॉप ठरला आहे.

रिंकू सिंगने आतापर्यंत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी १५ सामने खेळले असून यादरम्यान त्याने ११ डावात ३५६ धावा केल्या आहेत. या काळात त्याचा स्ट्राइक रेट १७६ राहिला, मात्र असे असतानाही त्याला टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघात स्थान मिळाले नाही. शिवम दुबेच्या फ्लॉपनंतरही निवडकर्त्यांनी रिंकूला संघात स्थान न देऊन मोठी चूक केली का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या विजयानंतर भारतीय क्रिकेटप्रेमींनी जल्लोष साजरा केला. भारताच्या या विजयानंतर बीसीसीआयचे सचिव जय शाह त्यांची न पाहिलेली शैली सर्वांसमोर आली. हा सामना पाहण्यासाठी बीसीसीआयचे चेअरमन रॉजर बिन्नी, व्हाईस चेअरमन राजीव शुक्ला, सेक्रेटरी जय शाह आणि आयपीएल चेअरमन अरुण धुमाळ स्टेडियममध्ये उपस्थित होते. भारताने सामना जिंकताच जय शाह यांनी जल्लोष साजरा करण्यास सुरुवात केली. ते प्रेक्षकांना अभिवादन करून आपला आनंद व्यक्त करीत होते. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# बाप बाप असतो! भारतीय चाहते उडवतायेत पाकिस्तानची खिल्ली

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारत-पाकिस्तानमध्ये रोमांचक सामना झाला. शेवटच्या ४५ मिनिटांत भारताने फक्त सामनाच जिंकला नाही, तर क्रिकेट चाहत्यांना खेळाचा सर्वोत्तम थरार अनुभवता आला. भारताचा विजय झाल्यामुळे क्रिकेट फॅन्स सध्या प्रचंड खुश आहेत. काही जण तर मीम्सच्या माध्यमातून पाकिस्तानची फिरकीसुद्धा घेत आहेत.



न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी इंटरनॅशनल स्टेडियमवर भारतीय गोलंदाजांनी चमत्कार केला. प्रथम फलंदाजी करून भारताने केवळ ११९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ केवळ ११३ धावा करू शकला. त्यामुळे भारताचा दणदणीत विजय झाला. भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध मिळवलेला हा विजय खूप खास आहे.

भारतीय खेळाडूंचे सोशल मीडियावर कौतकच कौतुक होत आहे. काहींनी पाकिस्तानची घेतली फिरकी घेतली. बुम बुम बमराह, भारतीय टीमचा जल्लोष, जिंकलोच, बुमराहने असा हिसकावला पाकिस्तानच्या तोंडातला घास, भारताला कमी समजण्याची चूक चुकूनही करू नका, त्यांना आधीच माहिती होतं, असे म्हणत चाहत्यांनी पाकिस्तानला डिवचले आहे.

भारत-पाकिस्तान यांच्यातील वैर नवीन नाही. मैत्रीसाठी कितीही हात पुढे केले, तरी खेळाच्या मैदानावर या दोन्ही देशांचे खेळाडू जीव तोडून खेळतात. मग तो खेळ कोणताही असो आणि त्यात हा सामना क्रिकेटचा असेल, तर एखाद्या युद्धाप्रमाणे वातावरण निर्माण झालेले असते. चाहत्यांमध्ये तर वेगळीच चुरस आणि चढाओढ रंगते. त्यामुळेच खेळाडूंवरही कमालीचे दडपण येते. अशातच या सामन्यातही रंगत आली.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com